
# ई-अभ्यंग






## ई-अभ्यंग
### गुढी पाडवा विशेषांक


(मध्यवर्ती कार्यालय)
द्वारा श्री विनय सुधाकर अभ्यंकर,
३, ओम गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
आदर्श निवास केन्द्र, ठाणे (प): ४००६०३


⌘ **अनुक्रमणिका** ⌘


१. संपादकीय ........ ०२
२. मना घडवी संस्कार ........ ०३
३. श्री समर्थ रामदास स्वामी ........ ०४
४. शास्त्रीय संगीतातील नव्या पिढीचा रोल मॉडेल ........ ०७
५. ठिपकेवाला मुनिया ........ ०९
६. बँके संबंधी काही इंग्रजी शब्दांचे अर्थ ........ ११
७. साजूक तूप ........ १५
८. उपयुक्त लिंक्स ........ १६
९. स्पेशल नान, कश्मिरी दम आलू ........ १९
१०. गाथा महान क्रिकेटविरांची ........ २०
११. व्यायामाचा प्रकार व दहा मिनिटात खर्च होणा-या कॅलरीज विषयी माहिती .. २४
१२. भगवद्गीतेतील व्यवस्थापनशास्त्र ........ २५
१३. अभ्यंकर परिवाराचे वार्षिक स्नेहसंम्मेलन व सर्वसाधरण सभा ........ २८
१४. रिसोर्टस ........ ३०
१५. डहाणू येथे दिनांक २२ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्ये १९साव्यें वार्षिक स्नेहसंमेलन ........ ३१-४२


## ई-अभ्यंग
### गुढी पाडवा विशेषांक


**संपादक - मंडळ**

**श्री संजय प्रभाकर अभ्यंकर**
प्रमुख संपादक

**श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर**
कार्यकारी संपादक

**श्री लिलाधर शंकर अभ्यंकर**
सह-संपादक

**श्री निशिकांत शंकर अभ्यंकर**
सह-संपादक

**सल्लागार**

श्री विनय सुधाकर अभ्यंकर, मुंबई

सौ. अरुंधती जयंत नगरकर, ठाणे

सौ. प्रज्ञा संजय अभ्यंकर, ठाणे

सौ. आरती संजय कार्लेकर, सावंतवाडी

श्री सचिन दिनकर अभ्यंकर, पुणे

श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार

अंकात प्रकाशित केलेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



**संपादकीय**

**स**र्व प्रथम अभ्यंकर कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी यांना गुढीपाडवा व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. या वर्षीचा गुढीपाडवा हा उल्लेखनीय व चिरस्मरणीय असा ठरावा कारण आपल्या महान क्रिकेटपटुंनी गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या पूर्वसंध्येला तब्बल 28 वर्षा नंतर विश्वकप जिंकून सर्व भारतवासियांना एक अविस्मरणीय भेट दिली आहे. त्यामुळे त्या सर्वांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच. या वेळी सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या भारतीय संघाने हा विश्वकप जिंकला व संपूर्ण देश- विदेशात आपले व आपल्या देशाचे नाव उज्वळ तो अविस्मरणीय सामना भारताच्या महाराष्ट्र राज्याच्या मुंबापुरीत वानखेडे स्टेडियम येथे जिंकला असल्याने त्याचे फार मोठे महत्व आहे. या सामन्याचे सर्व श्रेय आपल्या महाराष्ट्राला व मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर व भारताचा अजिंक्य कप्तान महेद्र सिंह धोनी व युवराज सिह यांना जाते.

आता मराठी नव वर्षाच्या गुढीपाडवा या विशेष ई-अंका विषयी. अभ्यंकर परिवाराच्या कार्यकारिणीने दिनांक 1 नोव्हेंबर 2009 रोजी मालवण येथे संपन्न झालेल्या 18व्या वार्षिक स्नेहसंम्मेलनात श्री सुधाकर कृष्णाजी उर्फ बापू अभ्यंकर व सुप्रसिद्ध टीव्ही व सिने कलाकार श्री आनंद अभ्यंकर यांच्या उपस्थितित धोषित केल्या प्रमाणे मंगळवार दिनांक 16 मार्च 2010 रोजी पहिला गुढीपाडवा ई-विशेषांक व त्यानंतर दुसरा दिवाळी पाडवा ई-विशेषांक आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशिर्वादाने व श्री गजानन महाराजांच्या कृपेने अभ्यंकर परिवाराच्या www.abhyankarparivar.com या संकेतस्थळावर प्रदर्शित केला आहे. या दोन्ही अंकांची सीडी परिवाराच्या कार्यकारिणीकडे उपलब्ध असून नाममात्र 30 रुपये या दराने उपलब्ध आहे.

या वर्षीच्या गुढीपाडव्याच्या शुभ मुहुर्तावर अभ्यंकर परिवाराच्या कार्यकारी मंडळाने असे ठरविले आहे की अभ्यंकर कुलवृतांताचे निर्माते कै. श्री ज.द. अभ्यंकर यांनी ज्याप्रमाणे विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन अभ्यंकर कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी यांची माहिती संकलित करुन अभ्यंकर कुलवृतांत तयार केला त्याप्रमाणे कार्यकारिणीचे पदाधिकारी व सहकारी कुलवृतांतातील माहिती अद्ययावत करण्याचे दृष्टीने प्रत्येक कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी यांना प्रत्यक्ष वा त्यांच्या नातेवाईकांमार्फत भेटी देऊन कुलवृतांतातील त्यांच्या नावा पुढील विस्तृत माहिती संकलित करतील व ती कुलवृत्तांत समाविष्ठ करुन कुलवृतांत लवकरात लवकर अद्ययावत करतील. या कार्याकरिता आपणा सर्वांना मनःपुर्वक विनंती आहे की आपल्या घरी जर कोणी अभ्यंकर परिवाराचे पदाधिकारी व सहकारी आले तर त्यांना निराश न करता आपल्या कुटुंबाची संपूर्ण माहिती त्यांनी दिलेल्या फॉर्म मध्ये लेखी स्वरुपात भरुन द्यावी. तसेच आपला ई-मेल आय डी व भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक अवश्य लिहावा तसेच आपल्या कुटुंबाबद्दल संपूर्ण माहिती जन्म तारीख, शिक्षण, नोकरी/व्यवसाय, विशेष कार्य इत्यादी सविस्तर लिहावी तसेच दिलेल्या फॉर्म मध्ये जागा अपुरी असल्यास वेगळ्या कागदावर लिहून जोडावी. वरील उपक्रमाकरिता अर्थात माहिती संकलित करण्याकरिता कोणी इच्छुक कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी तयार असतील तर त्यांनी कार्यकारिणीशी संपर्क साधावा. आपले स्वागतच आहे.

अभ्यंकर परिवाराच्या वेबसाईट वरील गुढीपाडवा व दिवाळी पाडवा या ई-विशेषांका द्वारे वारंवार विनंती करुनही फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याने कार्यकारी मंडळाने विविध वृत्तपत्र/मासिकातून संकलित केलेली माहिती आपणा पर्यंत पोहचावी म्हणून त्याचा समावेश या गुढीपाडवा ई-अंकात केला आहे तो आपल्याला निश्चितच आवडेल.

अंकाच्या आरंभ महाराष्ट्राचे महान युगपुरुष श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या संकलित लेखाद्वारे केला असुन समर्थांच्या कार्याविषयीची माहिती या लेखात दिली आहे.

शास्त्रीय संगीतातील नव्या पिढीचा रोल मॉडेल सुप्रसिद्ध गायक श्री संजीव अभ्यंकर यांचा लोकसत्ता मध्ये

शर्वरी जोशी यांनी प्रकाशित केलेल्या मुलाखतीवल आधारित लेख आपल्याला व नवोदित कलाकारांना मार्गदर्शक व निश्चितच लाभदायक ठरेल या विचाराने प्रस्तुत केला आहे. नंतरचा लेख वेग-वेगळ्या पक्ष्यांपैकी एक ठिपकेवाला मुनिया या विषयी संकलित करुन सादर केला आहे. या पक्षाचा संपूर्ण दिनक्रमच आपल्याला वाचायला मिळेल.

अर्थव्यवहाराशी संबंधित अनेक गोष्टी ज्या आपल्या नेहमी बोलण्यात, ऐकण्यात येतात त्याचा समावेश बॅंकेविषयी 100 गोष्टी या शीर्षका मध्ये येथे केला आहे. येथे बॅंके विषयी काही इंग्रजी शब्दांचे/वाक्यांशाचे मराठीत अर्थ दिले आहे जे आपल्याला सहज समजण्या योग्य आहे.

त्यानंतर कंप्यूटर वरिल उपयुक्त लिंक्स या लेखाद्वारे आपल्या दैनंदिन जीवनात उपयुक्त असणा-या विविध लिंक्स येथे दिल्या असल्याने त्याचा उपयोग आपणाला निश्चितच होईल याची खात्री आहे. तसेच रोजगाराविषयक विविध सरकारी खाती किंवा आस्थापनांतील नोक-यांच्या ज्या जाहिराती असतात त्या विषयीची माहिती वेबसाईट्सच्या माध्यमातून आपण जाणून घेऊ शकता. या मध्ये शैक्षणिक संस्था, ऍव्हिएशन, बॅंकिंग, नागरी सेवा, संरक्षण, अभियांत्रिकी, फायनांस, हॉस्पिटॅलिटी, माहिती तंत्रज्ञान, ग्रंथालय शास्त्र, प्रसार माध्यम व वैद्यकीय, रेल्वे, स्वयंरोजगार, फार्मासी इत्यादि विषयाच्या लिंक्स आपल्याला येथे मिळतील त्याच्या अवश्य लाभ घ्यावा.

विश्वविख्यात महान क्रिकेटपटूं चंदू बोर्डे, दत्तू फडकर, सर डॉन ब्रॅडमन, नरेन ताम्हाणे, सुभाष गुप्ते, विजय हजारे व विजय मर्चंट अश्या अनेक महान गोलंदाज व फलंदाज क्रिकेटपटूंच्या कारकिर्दिची संकलित माहिती थोडक्यात येथे दिली आहे. याचा अवश्य लाभ घ्यावा.

त्यानंतर भगवद्गीतेतील व्यवस्थापन शास्त्र या लेखात डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर यांनी तरुण पिढीला यश व योग्य संधी मिळण्यासाठी भगवद्गीतेतील व्यवस्थापन शास्त्राचा आधारे संदेश पाठविण्याचा प्रयत्न केला आहे. सदर लेख आपल्याला निश्चितच आवडेल.

दिनांक 20-21 नोव्हेंबर 2010 रोजी अभ्यंकर परिवाराचे वार्षिक सर्वसाधरण सभा व स्नेहसंम्मेलन डहाणू येथील श्री गजानन महाराज भक्त निवास येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रसंगी काढलेली विविध छायाचित्रे आपल्या माहिती करीता शेवटी दिलेली आहेत. अवश्य बघा.

■■■■■

## मना घडवी संस्कार

**तेजः स्पर्शाने दूर होई अंघार।**
**जैसा मुळांचा वृक्षा असे आधार।**
**शिल्पास आकारी जैसा, शिल्पकार।**
**मना घडवी संस्कार।।१।।**

**मना उद्धरी संस्कार, मना भूषवी संस्कार।**
**मना तेजवी संस्कार, मना आकारी संस्कार।**
**मना आधार संस्कार,मना घडवी संस्कार।।२।।**

**मना नीती दे संस्कार,मना शांती दे संस्कार।**
**मना बुद्धी दे संस्कार,मना सिद्धी दे संस्कार।**
**मना शक्ती दे संस्कार, मना घडवी संस्कार।।३।।**

**मनाचे एश्वर्य संस्कार, मनाचे सौंदर्य संस्कार।**
**मना आदर्श संस्कार, मना सद्भाव संस्कार।**
**मना विवेक संस्कार, मना घडवी संस्कार।।४।।**

**संगीतकार श्रीधर फडके**

**२०वे** अभ्यंकर परिवार वार्षिक स्नेह संम्मेलन दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०११ रोजी नागपूर येथे आहे. देश विदेशातील सर्व अभ्यंकर कुलबंधू/भगिनी व माहेरवाशिणींना सस्नेह आग्रहाचे निमंत्रण।

**स्थळ :**

**उरुविला सभागृह,**
ऑरेंज सिटी हॉस्पिटल च्या शेजारी,
बजाज ऑटोच्या शेजारी, रिंग रोड,
खामला रोड, नागपूर-

**संपर्क :**

श्री प्रकाश अभ्यंकर :९८५०३१७०८९
श्री अशोक गजानन अभ्यंकर :९८९०९२६२३२
श्री निनाद गजानन अभ्यंकर :९४०३००३८६९

# स्वामी समर्थ रामदास

सौ. स्नेहलता अभ्यंकर



**श्री** समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म जांब या गावी शके 1530 (सन् 1608) रामनवमीच्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध नवमीस, रामजन्माच्याच शुभमुहुर्तावर, माध्यान्ही झाला. ठोसरांचे घराणे सूर्योपासक होते. नारायण सात वर्षाचा असतांनाच वडील सूर्याजिपंतांचे निधन झाले. घरची सांपत्तिक स्थिती चांगली होती. पण नारायण लहानपणापासूनच विरक्त होते तसेच अतिशय बुद्धिमान, निश्चयी व खोडकरही होते.



समर्थांचे लग्न 12व्या वर्षी ठरविण्यात आले. लग्न-समारंभात पुरोहितांनी सावधान हा शब्द उच्चारतांच समर्थ अंगावरील वस्त्रानिशी लग्न मंडपातून पळाले. लोकांनी पाठलाग केला, पण त्यांनी गांवाबाहेरची नदी गाठली आणि नदीच्या खोल डोहांत उडी मारली.

पुढे तेथून पायी चालत चालत पंचवटीस येऊन त्यांनी श्री रामाचे दर्शन घेतले आणि टाकळीस दीर्घ तपश्चर्या केली. समर्थ प्रतिदिन सूर्योदयापासून माध्याह्यापर्यंत नदीच्या डोहात छातीइतक्या पाण्यांत उभे राहून गायत्री पुरश्चरण करीत व अश्या प्रकारे समर्थांनी श्री रामनामाचे 12 कोटी नामस्मरण करून अवतार कार्याला आरंभ केला. साक्षात प्रभू श्रीराम हेच त्यांचे सद्गुरू झाले. 12 वर्षाच्या तीव्र तपश्चर्येनंतर जेव्हा समर्थांना आत्म-साक्षात्कार झाला, त्यावेळी त्यांचे वय 24 वर्ष होते.

त्यानंतर पुढील 12 वर्षे समर्थांनी तीर्थयात्रा केली व संपूर्ण हिंदुस्थान पायांखाली घातला तसेच प्रत्येक ठिकाणच्या लोक-स्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केले. भारत-भ्रमण करीत असतां पंजाबांत शीखांचे सहावे गुरु हरगोविंद यांच्याशी समर्थांची भेट झाली होती. समाजाच्या दुर्धर स्थितीबाबत त्यांनी चर्चा केली. तसेच प्रचलित सर्व शास्त्रांचा अभ्यासही केला, आणि वयाच्या 36व्या वर्षी ते महाराष्ट्रात परत आले.

समर्थांचे वर्णन करावयाचे झाले तर मध्यम उंची, मजबूत बांधा, गौर वर्ण, तेजस्वी कांति, कपाळावर लहानसे टेंगुळ, असे समर्थांचे स्वरूप होते. कमरेस लंगोटी, किंवा कधी कफनी, पायांत खडावा, लांब दाढी, जटा, गळ्यांत जपायची माळ, यज्ञोपवीत, हातांत कुबडी, कांखेस झोळी, अशा थाटांत समर्थांची रूबाबदार मूर्ति संचार करीत असे. समर्थ अतिशय चपळ होते. ते भरभर चालत. एका ठिकाणी फारसे रहात नसत. स्नान-संध्या एके ठिकाणी, भोजन दुसरे ठिकाणी, तर विश्रांती तिसरीकडे असा त्यांचा खाक्या होता. ते मितभाषी आणि शिस्तीचे होते. त्यांना मनुष्याची उत्तम पारख होती. ते स्वत:उद्योगी असल्यामुळे आळशी मनुष्य त्यांना आवडत नसे. आळशी मनुष्यास ते करंटा म्हणत. त्यांना लोक-स्थितीचे उत्तम ज्ञान होते, अनेक भाषा अवगत होत्या. मराठी, संस्कृत, हिंदी व उर्दू यांवर त्यांचे प्रभुत्व होते.

पुढे श्री समर्थांना आत्म-साक्षात्कार झाल्यानंतर त्यांना सामान्य लोकांनाही पारमार्थिक मार्गास लावावे, अशी इच्छा झाली. पण पुढील 12 वर्षाच्या प्रवासांत त्यांनी जे पाहीले, जे भयंकर विदारक अनुभविले त्यामुळे त्यांच्या आयुष्यात एक वेगळीच कलाटणी मिळाली. त्या काळी भारतांतील जनता

कमालीच्या हीन, दीन, त्रस्त आणि अपमानित अवस्थेत काळ कंठीत होती व यवनी सत्तेच्या अमानुष जुलुमाखाली भरडली जात होती. लोकांची मालमत्ता, बायका-मुले, आया-बहिणी, देव, धर्म, संस्कृती, कांहीच सुरक्षित नव्हते. जनतेची ही हृदय-द्रावक स्थिती पाहून समर्थ अत्यंत अस्वस्थ झाले.

सर्वस्वी दुर्बल झालेल्या आपल्या समाजास परमार्थाचा उपदेश हानिकारकच ठरण्याचा संभव आहे, समाजाला प्रथम संघटित आणि शक्ति-सम्पन्न बनविले पाहीजे, समाजाचा लुप्त झालेला आत्म-विश्वास पुन: जागृत केला पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली.

मसूरास रामनवमीचा उत्सव करून समर्थांनी आपल्या लोकोद्धाराच्या कार्याला पाया घातला. शके 1570 मध्ये त्यांनी चाफळास राम-मंदिराची स्थापना केली तसेच निरनिराळ्या गांवी अकरा मारूतींच्या मंदिराची स्थापना केली.

समर्थ रामदासांच्या जय जय रघुवीर समर्थ या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला. द-या-खो-यातून, डोंगर कपारीतून एकच आवाज घुमला. सह्याद्रीच नव्हे तर गंगा-यमुना आणि कावेरीची खोरेही या घोषणेने दणाणून गेली. धर्मसत्ता व राजसत्ता यांचा अपूर्व समन्वय साधून सशक्त तरुणांची मने राष्ट्रवादाने भारून टाकली. प्रभू श्रीरामचंद्र, आदिशक्ती तुळजा भवानी आणि शक्ती उपासनेसाठी मारुतीराया या तीन देवतांचा जागर त्यांनी समाजात मांडला. स्वत: डोंगरद-यात, घळीत राहून समाजाचे व देशाच्या कल्याणाचेच चिंतन केले. समाजातील प्रत्येक घटकाला, अनेक अनाथ, निराधार बालकांना, स्त्रियांना सन्मार्गाचा, आत्मोद्धाराचा मार्ग त्यांनी दाखविला. प्रपंच आणि परमार्थ नेटका करण्यासाठी विवेकसंपन्न व्हा, असा उपदेश समर्थांनी दिला. त्यांनी आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहिले. हिंदुस्थान बलसंपन्न व्हावा यासाठीच क्षात्रतेज व ब्राह्मतेज जागविले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकोत्तर कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन स्वराज्य बलशाली व्हावे म्हणून समाजसंघटन करुन समर्थांनी राष्ट्रउभारणीच्या कार्याला मोलाची मदत केली. सहिष्णू व जयिष्णू धर्माचा समन्वय साधून रामराज्याचा मंत्र जागविला. शिवाजीमहाराज आग्र्याहून सुटुन महाराष्ट्रांत परत आले तेव्हां त्या जोखमीच्या परतीच्या प्रवासांत या मठांचा त्यांना उपयोग झाला होता.

विविध विषयांतून लीलया समाजप्रबोधन करणा-या समर्थांचे हे सर्व करीत असताना मुख्य उद्दिष्ट होते हिंदवी स्वराज्य! त्यासाठीच त्यांनी देशात हलकल्लोळ माजवला. शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीचा पाया भक्कम करण्याचे काम समर्थांमुळे सोपे झाले आणि या महाराष्ट्राच्या भुवनी आनंदवन उदयास आले.

सातारा, चाफल, सज्जनगड या परिसरात समर्थांचे वास्तव्य अधिक काळ होते. समर्थ स्थापित राम मंदिर, अकरा मारूतींची मंदिरे याच परिसरात आहेत. ती पुढीलप्रमाणे : (1) दास मारुती, चाफळ (2) वीर मारुती, चाफळ (3) खडीचा मारुती, चाफळ (डोंगरावर) (4) प्रताप मारुती, माजगांव, चाफळ (5) उंब्रज मारुती (ता. कराड) (6) शहापूर मारुती (उंब्रज जवळ) (7) मसुर मारुती (ता. कराड) (8) बहे-बोरगांव (कृष्णामाई) मारुती (जि. सांगली) (9) शिराळा मारुती (बत्तीस शिराळा, जि. सांगली) (10)मनपाडळे मारुती (जि. कोल्हापूर) (11) पारगांव मारुती (जि. कोल्हापूर).

समर्थ रामदासांनी दासबोधाचे लेखन रायगडाजवळील शिवथरघळीत बसून केले. चाफळ परिसरात समर्थांची व छत्रपती शिवाजी महाराजांची भेट झाल्याचे उल्लेख इतिहासात आढळतात. परमार्थ, अध्यात्म, श्रीराम व श्री हनुमानभक्ती आणि संपूर्ण समाजाचा नेटका प्रपंच या सर्वच बाबतीत स्वत: अत्युच्च स्थान गाठून समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या समर्थांनी शके 1571 च्या वैशाखांत श्री शिवाजी महाराजांना अनुग्रह दिला. महाराजांच्याच विनंतीवरून त्यांनी पुढे सज्जनगडावर वास्तव्य केले. शके 1602 (सन् 1680) मध्ये शिवाजीमहाराज कैलासवासी झाल्यानंतर पुढच्याच वर्षी माघ वद्य नवमी शके 1603 (शके 1681) समर्थांनीही सज्जनगडावर देह ठेवला. हीच दासनवमी होय.

समर्थांना मानवी गुरू नाही. स्वत: श्रीरामाने त्यांना राममंत्राचा अनुग्रह दिला अशी श्रद्धा आहे. ते स्वयं-प्रज्ञ होते. आपल्या आयुष्याचे ध्येय त्यांनी स्वत:च ठरविले, आणि ते साध्य करण्यासाठी मार्गही स्वत:च शोधला. समाजाविषयी अपार तळमळ, करुणा, हीच त्यांची प्रेरणा होती. धर्म -संस्थापना हेच त्यांचे कार्य होते.

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।
वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे ।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ।।

समाजाविषयीच्या अपार तळमळीतून समर्थांनी विपुल वाड्मय निर्मिति केली. रोखठोक विचार, साधी सरळ भाषा

आणि स्पष्ट निर्भीड मांडणी ही त्यांची वैशिष्ट्ये होती. दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, भीमरूपी स्त्रोत, सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ही गणपतीची आरती, लवथवती विक्राळ ब्रम्हांडी माळा ही शंकराची आरती, कांही पदे इत्यादि त्यांच्या कृति प्रसिद्ध आहे. श्रीमत् ग्रंथराज दासबोध या पारमार्थिक ग्रंथाची रचना त्यांनी शिवथरघळ (महाडजवळील) येथे केली. या शिवाय, दासबोध, रामायणांतील किष्किंधा, सुंदर व युद्ध ही कांडे, कित्येक अभंग, आरत्या, भूपाळ्या, पदे, स्तोत्रे, राजधर्म, क्षात्र-धर्म, शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज यांस पत्रे, आपल्या शिष्यांना मार्गदर्शन, मठ आणि त्यांतील उत्सव यांसंबंधी मार्गदर्शन, आत्माराम, अन्वय- व्यतिरेक, वैराग्य-शतक, ज्ञान-शतक, उपदेश-शतक, षडरिपु-विवेक इत्यादि विपुल लेखन समर्थांनी केले आहे.

समर्थांनी राष्ट्रउभारणीसाठी जसे बहुमोल मार्गदर्शन केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक या गोष्टींवरही भर दिला कारण यातूनच राष्ट्र उभे राहते, स्वराज्य स्थापन होते. लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची, वाचण्याची मोहीम काढली.

प्रपंच सोडून जर परमार्थ केला, तर केवळ आत्मोन्नती होईल परंतु प्रपंच करून परमार्थ केला, तर राष्ट्रोन्नती होईल. समर्थांनी साहित्य, कला, आरोग्य, जीवनशैली, निसर्ग, बांधकाम, उद्योग या विषयांवरही लिहिले आहे. जीवनाचे कोणतेही अंग समर्थांनी सोडलेले नाही. सर्वच क्षेत्रांत उच्च ध्येय गाठण्यासाठी, यश मिळवण्यासाठी काय करावे, याचे तपशीलवार मार्गदर्शन समर्थ करतात. परळी येथे मठस्थापना करताना मठाच्या परिसरात बाग करण्यात येत होती त्या वेळी त्यांनी बागेवरती एक अखंड प्रकरणच लिहीले. तसेच सामानगडावर किल्ले बांधताना लिहिलेल्या कारखाने या प्रकारणाच्या पहिल्या समासात विटा कशा कराव्यात, बांधकाम या प्रकरणात मजुरांना कशी किती कामे द्यावीत यासारखी सर्व माहिती त्यांनी दिली आहे.

याशिवाय गाणे कसे असावे हे सांगताना समर्थ लिहितात, बाळके श्वासपदे पक्षी। लोभती वेधती मनी । चित्त निश्चिंत होतही । धन्य ते गायनी कळा ।। मराठी (प्राकृत) भाषेचा अभिमानही समर्थ व्यक्त करतात. समर्थ लिहितात, येक म्हणजी म-हाठी काय। हे तो भल्यासी ऐको नये । ती मूर्ख नेणती सोय। अर्थान्वयाची ।। लोहाची मांदूस केली। नाना रत्ने साठविली । ती अभाग्याने त्यागिली। लोखंड म्हणोनी। तैसी भाषा प्राकृत।।

असे अनेक विषय त्यांच्या साहित्यात आहेत. समर्थांची मराठी भाषा ही मोजक्याच पण ठसठशीत शब्दात सर्व काही सांगणारी भाषा आहे. समृद्ध शब्दरचना, मराठी शब्दांची वैभवशाली उधळण, तर्कशुद्ध विचारांची रेखीव नेटकी मांडणी आणि माणसाच्या जीवनाचे, अगदी छोट्या- छोट्या व्यवहारांचे सूक्ष्म निरीक्षण (अन् त्याचे प्रकटीकरण) ही समर्थांच्या साहित्याची आणखी काही वैशिष्ट्ये. विशिष्ट लय, गेयता ही देखील त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. समर्थांची काव्यरचना आणि तिचे साहित्यगुण हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय आहे.अशा या थोर संतास कोटी-कोटी प्रणाम.

■■■■■

## महत्वाची इस्पितळे व त्यांचे दूरध्वनी, मुंबई

| | |
|---|---|
| आशा पारेख हॉस्पिटल सांताक्रूज | २६४९३७३७ |
| भाभा हॉस्पिटल बांद्रा, | २६४२२७७५ |
| भगवती हॉस्पिटल बोरिवली | २८९३२४६१ |
| भक्तिवेदांत हॉस्पिटल मिरा रोड | २८१२८८८८ |
| बॉम्बे हॉस्पिटल, न्यू मरिन लाइन्स | २२०६७२५४ |
| कूपर म्युनि. जनरल हॉस्पिटल जुहू | २६२०७२५४ |
| हिंदुजा हॉस्पिटल, माहीम | २४४४९१९९ |
| नानवटी हॉस्पिटल | २६१७२२८६ |
| जे जे हॉस्पिटल सॅण्डहर्स्ट रोड | २३७३५५५५ |
| जीवन ज्योत हॉस्पिटल घाटकोपर | २५१४४४४५ |
| केईएम हॉस्पिटल परळ | २४१३२५७५ |
| टाटा मेमोरियल हॉस्पिटल परळ | २४१४६७५० |
| वाडिया हॉस्पिटल (मुलांसाठी) | २४१२५८६ |

# शास्त्रीय संगीतातील नव्या पिढीचा रोल मॉडेल



**श्री विजय भास्कर अभ्यंकर**

'**प**र्जन्य तू ही है कोई रंग नहीं आकार नहीं.....' सात-आठ वर्षां पूर्वी सर्वत्र ऐकू येणारी व दाखवली जाणारी 'किनले मिनरल वॉटर' ची ही जाहिरात आठवतेय? ॲड वर्ल्ड मध्ये वर्षाकाठी अक्षरश: हजारो जाहिराती बनतात, पाहिल्या ऐकल्या जातात व तेवढ्याच पटकन विस्मरणातही जातात. कधी जाहिरातीतील उत्पादनाच्या गुणवत्तेमुळे, कधी त्यात झळकलेल्या 'ग्लॅमरस' चेह-यामुळे तर कधी त्या 'जिंगल' च्या शब्दसौंदर्यामुळे एखादीच जाहिरात मनात तळ ठोकून राहते. पण घ्पर्जन्य तू हैऽलक्षात राहिली ती काळजाचा ठाव घालणा-या सुमधुर गीतामुळे. जे गायले होते नव्या दमाचे व नव्या जमान्याचे लाडके शास्त्रीय संगीत गायक पं. संजीव अभ्यंकर.

संजीव ने गायलेली बहुतेक गीते मग ती शास्त्रीय संगीतावर आधारलेली असोत, गणेशमंत्र असो, भजने अथवा अभंग असो नाही तर अशी एखादी 'जिंगल' अथवा टीव्ही सीरिअलचे टायटल साँग असो, ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध केल्याशिवाय राहत नाहीत.

भारतीय शास्त्रीय संगीत हे अनेकांना कंटाळवाणे व वेळखाऊ वाटते. हे गायन फक्त अभिजात रसिकांसाठीच आहे असाही एक मतप्रवाह आहे. आताची तरुण पिढी शास्त्रीय संगीताला स्वीकारत नाही. कारण त्यांच्याजवळ तेवढा वेळ नाही, असे बिनबुडाचे आरोपही बरीच वडील मंडळी करीत असतात. संजीवने या सर्व गैरसमजुतींना मोडीत काढले आहे. 'रोळ मॉडेल' किंवा प्रेरणास्थान म्हणून आजची पिढी संजीवकडे बघते. नव्या पिढीला शास्त्रीय संगीताकडे वळविण्यात संजीवचा मोलाचा वाटा आहे.

आजघडीला ऑल इंडिया रेडिओचे राष्ट्रपतीपदक (1990) फाय फाऊंडेशन पुरस्कार, 1998 साली उत्कृष्ट पार्श्वगायनासाठीचा राष्ट्रीय पुरस्कार (गॉडमदरसाठी), रोटरीचा सूररत्न पुरस्कार व सर्वाधिक जिव्हाळ्याचा पं. जसराज पुरस्कार यासारख्या अगणित पुरस्कारांनी संजीवचे सांगितिक जीवन सजले आहे. एचएमव्ही, सोनी, टाइम्स म्युझिक, नवरस रेकॉर्डस (यूके), नीलम ऑडिओ व्हिज्युअल (यूएसए) बीएमजी क्रिसेंडो सारख्या अनेक मान्यताप्राप्त म्युझिक कंपन्यांनी संजीवच्या गायनाच्या सीडीज व अल्बम्स काढले आहेत. वयाच्या 35व्या वर्षापर्यंत त्यांचे 50 अल्बम बाजारात आले आणि तडाखेबंद खपासोबत लोकप्रियतेचा एकेक मानदंड रोवत गेले.

शास्त्रीय संगीताबरोरच अभंग, संस्कृत श्लोक वा मंत्र, भजने यातून संजीवच्या आवाजाची लवचिकता निदर्शनास येते. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या जुन्या व नव्या पिढीच्या लाडक्या संजीवने आपल्या करिअरबद्दल नुकतीच बातचीत केली.

**संजीव तुमचे बालपण सर्वसामान्य इतर मुलांसारखे गेले नाही. त्यावेळी तुम्हाला हा फरक जाणवत होता का?**

हो नक्कीच. मी तीन वर्षांचा असल्यापासून राग वगैरे गात असे. कारण माझी आई उत्कृष्ट गायिका आहे. तिच्याच तालमीत माझे कान व गळाही तयार होऊ लागला होता. पुढे वयाच्या अडनिड्या वळणावर मी शास्त्रीय संगीताच्या समुद्रात खेचलो गेलो. शास्त्रीय संगीताचे अध्वर्यू पं. जसराज यांनी माझा शिष्य म्हणून स्वीकार केला व गुरुकुल पद्धतीने माझे शिक्षण सुरू झाले. त्यावेळी करिअर वगैरे संकल्पना मनात नव्हत्या. पण आपण फक्त गाणेच करणार आहोत याबद्दल खात्री होती. त्यामुळे गुरुजींनी जे सांगितले ते मन लावून शिकणे व रियाझ करणे एवढेच मी करीत असे.

घरची आठवण तर छोट्या छोट्या गोष्टींनी येत असे. उदा. घरी आईच्या हातची गरम पोळी, माझा बिछाना घालणारा माणूस अशासारख्या बारीकसारीक गोष्टी ही त्यावेळी मोठ्या वाटत. गुरुजींकडे स्वत:चे काम स्वत: करावे लागे. यामागे स्वयंशिस्तीचा भाग होता व पुढे तेच सर्व फार उपयोगी पडले. शारंग व दुर्गा यांनीही मला धाकट्या भावंडाप्रमाणे मानले. त्यामुळे सगळी कसर निघून जाई.

**गुरुजींच्या तालमीत असतानाच्या काही खास आठवणी आहेत का ?**

अगदी अगणित आहेत. त्यावेळी गुरुजी म्हणतील ते फक्त ऐकले पाहिजे असा दंडक होता. पहाटे साडेचारला उठून रियाझ केलाच पाहिजे. तसेच दिवसातून तीन वेळा रियाझ व्हायलाच हवा यावर त्यांचा कटाक्ष असे. अनेकदा गुरुजी कार्यक्रमाच्या निमित्ताने बराच प्रवास करीत. मी त्यांच्या कार्यक्रमाला हजर असायलाच हवे असा त्यांचा आग्रह असे ते

विमानाने निघून जात. पाठोपाठ मिळेल त्या वाहनाने कार्यक्रमाच्या वेळेत त्या त्या ठिकाणी पोहोचले पाहिजे हे आवश्यक असे.

**तरुण वयात आपल्या मित्रमंडळीत सतत राहावेसे वाटते. अशा वेळी कधी अस्वस्थ वाटले नाही का ?**

रोज संध्याकाळी मित्रमंडळी कट्ट्यावर जमत. मलाही खूप जावेसे वाटे. पण त्याच वेळी आमचा तबलजी साथ करायला येत असे. त्यामुळे ती वेळ रियाझासाठीच राखीव होती. पण अस्वस्थ वाटण्याचे वय हळूहळू मागे पडले होते. आपले आयुष्य सर्वसामान्यांसारखे नाही याची जाणीव मूळ धरू लागली होती. दरम्यान माझे गाणेही लोकांना आवडू लागले होते. मोठी स्वप्ने उराशी बाळगायची तर छोट्या छोट्या गोष्टींची बाऊ करण्यात अर्थ नाही एवढी समज मला आली होती.

**संजीव, तुमचे गाणे आज तरुण पीढीही उत्साहाने ऐकते. ब-याच जणांना शास्त्रीय संगीत शिकावेसे वाटते. यांच्यासाठी तुम्ही काय सांगाल ?**

घरात जर कुणी गाणारे किंवा जाणकार असेल तर आपल्या मुलाचा गळा गाता आहे की नाही हे चटकन लक्षात येते. अशा वेळी आपल्या मुलाला योग्य संगीत शिक्षकाकडे पाठवावे. सुरुवातीला अगदी फार मोठ्या नावांच्या मागे न लागता. मुलांना तीन ते चार वर्षे प्राथमिक शिक्षण घेऊ द्यावे. मुलाची कुवत व आवड असेल तर पुढचे मार्ग आपोआपच मोकळे होत जातात.

**आज शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी द्यावा लागणारा वेळ नव्या पीढीजवळ नाही. अशा वेळी काय करावे ?**

वेळ नाही वगैरे काही नसते. अनेक मुले/मुली शास्त्रीय संगीतात उत्तम प्रगती करताना आपण आज पाहतो. टी.व्ही.वरील 'टॅलेंट हंट' कार्यक्रमात हे चांगलेच जाणवते. परंतु मुलांनी शास्त्रीय संगीत हेच पूर्णवेळ करिअर करावे असे मी म्हणणार नाही. कारण या क्षेत्रात स्पर्धा प्रचंड असून, भविष्य सुरक्षितच असेल असे नाही. ज्यांच्या घरून आर्थिक पाठबळ भक्कम आहे अशांनी हे पूर्णवेळ करिअर निवडावे, कारण तेच व्यवहार्य आहे असे मला वाटते. तुम्हाला स्थिरस्थावर होऊन स्वत:चे नियमित उत्पन्न सुरू व्हायला किती वाट पाहावी लागेल हे सांगता येत नाही. ब-याचदा तुमच्या मेहनतीबरोबरच नशिबाचा भागही असतो असेच मी म्हणेन.

**मग शास्त्रीय संगीत हे 'करिअर ऑप्शन' होऊ शकते का ?**

हो जरूर होऊ शकते. पण पुन्हा: एकदा मी सांगेन की येथे केवळ मेहनत करून भागत नाही. योग्य संधी मिळणे यावरही बरेच काही अवलंबून असते. तुम्ही अगदी 'टॉप' वर जरी पोहोचलात नाही तरी आज शास्त्रीय संगीत क्लास चालवून एक उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करू शकता. संगीत शिकवणारी आजकालची मंडळी अतिशय व्यावसायिक असून उत्तम उत्पन्न मिळवतात. पूर्वीच्या संगीत शिक्षकांसारखी त्यांची अवस्था नाही. आजकाल सर्वच क्षेत्रांत आलेल्या प्रचंड व्यावसायिकतेमुळे उत्पन्नाचे नवनवीन मार्ग खुले झाले आहेत. फक्त तुम्हाला ते 'एनकॅश' करता आले पाहिजेत. 'टॅलेंट हंट' कार्याक्रमांमुळे खेड्यापाड्यांतून आलेली प्रतिभावान मुले लोकांसमोर येऊन आपली कला सादर करू शकतात व उत्कृष्ट आवाज व गायकी असल्यास 'इंडस्ट्री' त्यांना कसे डोक्यावर घेते हे आपण पाहतोच.

**या 'टॅलेंट हंट' कार्यक्रमाच्या विश्वासार्हतेबद्दल काय सांगाल?**

काही ठिकाणी वाद, मतभेद होतातच, पण म्हणून त्यात भाग घ्यायचाच नाही असे नाही. एकदा निवड झाल्यानंतर तुमचे जे 'ग्रुमिंग' शुरू होते त्याचा पुढील व्यावसायिक जीवनात अतिशय फायदा होतो. नव्या पिढीला हे व्यासपीठ उपलब्ध झाले हे त्यांचे भाग्यच आहे. त्याचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला पाहिजे.

नव्या पिढीबद्दल आश्वस्त असणा-या संजीवला या नव्या कलाकारांचे अतिशय कौतुक वाटते. शास्त्रीय संगीत या पिढीतून हद्दपार होणार नाहीच पण अधिकाधिक तरुण मंडळी इकडे कशी वळतील यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. नव्याचा स्वीकार करीत राहणे हाच सच्चा कलाकाराचा धर्म असला पाहिजे तरच त्याची कला प्रवाही राहते. नव्याचे नवेपण स्वीकारताना जुन्या प्रवाहांनाही ते नजरेआड होऊ देत नाही. संजीवची गायकी म्हणूनच जुन्या खानदानीपणाचा बाज टिकवून आहे आणि त्याबरोबरच आधुनिक प्रवाहांच्या अवखळपणाचेही तेथे स्वागतच होते.

■■■■■

- ज्ञानात मिळते तेवढे परम सुख अन्य कशातही नाही।
- अडचण भासली की भावना दूर ठेवाव्या लागतात।
- स्वतःची चूक कबूल करायला मनाचा मोठेपणा लागतो।

# ठिपकेवाला मुनिया

पिंपळे निळखचे ते माळरान. ऑगस्ट महीना होता. गवताच्या गालिच्यातून एक चिमुरडा पक्षी चोचीत एक गवतपात घेऊन उडाला. तो गेला सरळ समोरच्या एका खुरट्या खैराच्या झाडावर. जरा जवळ जाऊन पाहिले तर त्याचे घरटे बनवायचे काम चालू होते.

हा चिमुरडा पक्षी चिमणीपेक्षाही लहान म्हणजे अगदी 11 से.मी. चा होता. शेपूट टोकदार होती, पाठ तपकिरी आणि पोटावर काळी किनार असलेली पांढरी पिसं होती. अशा पिसांद्वारे निसर्गाने जणू जाळीदार नक्षीच केली आहे. या ठिपक्यांमुळेच या चिमुरड्याला 'ठिपकेवाला मुनिया' किंवा 'ठिपक्यांची मनोली' म्हणतात !



'ठिपकेवाला मुनिया' वीण ऐन पावसाळी महिन्यात म्हणजे जुलै ते ऑगस्ट मध्ये असते. नर आणि मादी दोघेही दिसायला सारखेच असतात. मादीला आकर्षित करण्यासाठी नर सुंदर गाणे गातो. त्यामुळे दुसरे एक किंवा अनेक नर ठिपकेवाला मुनियाकडे आकर्षित होतात. गाणा-या त्या नराला अगदी खेटून बसतात आणि अतिशय लक्षपूर्वक त्याच्या चोचीकडे काही शोधत असल्यासारखे बघत राहातात. याला 'पिअरिंग' असे म्हणतात. मादीला मग गाणारा नर गवतपात चोचीत घेऊन पंख व शेपूट फडफडवून दाखवतो. मीच श्रेष्ठ आहे, माझा स्वीकार कर असे मादीला सुचवतो. मादीला जर तो नर पसंत असेल तर ती सुद्धा एक गवतपात उचलते आणि आपले पंख फडफडवून होकार देते. काय मजेदार पद्धत आहे ना प्रणयाराधनेची !

जोडी जमल्यावर नर आणि मादी दोघंही मिळून घरटं बनवायच्या कामाला लागतात. यांचे घरटे झाडात, वेलीत तर क्वचित उंच ताडांवर असे कमालीचे लपवलेले असते. जोपर्यंत चोचीत गवतपात घेऊन जाणारा ठिपकेवाला मुनिया दिसत नाही तो पर्यंत त्याचे घरटे शोधणे महाकठीण कामच समजायचे ! कधी- कधी हे आपले घरटे भरपूर मुंग्या असलेल्या झुडूपात बनवतात. त्यामुळे त्यांच्याशिवाय दुसरा कोणताही पक्षी त्या झुडपात येत नाही आणि शत्रूपासून रक्षणही होते. गवतपात खुडून घरटे बनवण्यासाठी निवडलेल्या झाडावर येतो. हे झाडही खूप विचारपूर्वक निवडले जाते. बाभूळ, खैर, हिवर असे काटेरी वृक्षच निवडले जातात. झाड निवडल्यानंतर त्यावर जागासुद्धा काळजीपूर्वक निवडली जाते. 'ठिपकेवाला मुनिया' स्वत: जितके उंच होता येईल तितकी मान उंचावून पंख पसरवात. घरटे बनवताना झाडाच्या बारीक फांद्या बांधकामास अडचण आणणार नाहीत याची खात्री झाल्यावर मादी त्याच फांदीवर बसून राहते आणि नर गवतपात आणायला निघून जातो. ठिपकेवाला मुनियाने खैराचे झाड निवडले होते. तिथे खैराच्या खोडातून दोन- तीन फांद्या फुटल्या होत्या, त्यात अगदी फुटबॉल एवढे चेंडुमय घरटे बनवले होते. जमिनीपासून

घरट्याची उंची जेमतेम पाच फूट होती. एरवी घरट्याची जमिनीपासून उंची पाच ते सात फूट असते. क्वचित जमिनीपासून 12 फुटापर्यंत जाड व काटेरी झाडांवरही घरटे बनवले जाते.

या घरट्याला एका बाजूला गोल छिद्र होते. हे छिद्र म्हणजे घरट्याचे प्रवेशद्वार. प्रवेशद्वार दोन इंचाचे होते. हिरवीगार गवतपात आणायचे तर ठिपकेवाला मुनियानने आणि घरटे बनवण्याचे काम मात्र मादीच करते. हे नर पण खूपच सतर्क असतात. गवतपात घेऊन जाणा-या ठिपकेवाला मुनियाच्या मार्गात जर आपण अजाणता थांबलो असेल, तर तो घरट्यात सरळ जात नाही. ते माणसं जायची वाट बघतात. आपण जर त्यांच्याकडे थोडा वेळ बघत राहिलो, तर चोचीतले गवतपात सोडून देतात. जणू काहीच करत नव्हतो असे आपल्याला भासवतात. आपले घरटे सुरक्षित रहावे म्हणून अशी क्लृप्ती हे पक्षी वापरतात.

नराने आणून दिलेले गवतपात मादी घेते आणि खाली मजबूत गवताचा जाड पाया बनवून सुरुवात करते. नर दर मिनिटाला एक गवतपात आणून देतो आणि मादी घरटे बांधत राहते. पहाटे लवकर दोघेही काम सुरु करतात. तासभर काम केल्यानंतर संध्याकाळी उशिरापर्यंत ‘कीटी, कीटी, कीटी’ असा आवाज करत घरट्याचे काम चालू असते. गवतपात मिळत नसल्यास गवताचाच प्रकार असलेल्या बांबूची पाने, ज्वारी किंवा बाजरीची पाने, तांदूळ व तत्सम पिकातले हिरवेगार तंतू वापरण्यात येतात. हे घरटं म्हणजे चेंडूच्या आकाराचा मोठा गोळाच बनवला जातो. या गोळ्याचा व्यास 8 ते 10 इंच असतो आणि उंची 6 ते 7 इंच एवढी असते. आतल्या पोकळीचा व्यास 5 इंच इतका असतो. पाने फक्त एकमेकांवर खोचली जातात. गवतपातांची ही भिंत एक इंच जाड असते. कोणत्याही प्रकारचे चिटकवण्याचे साहित्य वापरले जात नाही. तरीसुद्धा हे घरटे अगदी वॉटरप्रूफ असते. पावसाचा एक थेंबही आत जात नाही. घरट्याच्या थराला आणि आतल्या बाजूने बारीक नाजूक गवतांचे किंवा गव्हाचे तुरे, किंवा ज्वारी, बाजरी किंवा मक्याचे तारसारखे अत्यंत बारीक मुळांचे अस्तर दिले जाते.

घरटे पूर्ण झाले की मादी अशा मोठ्या घरट्यात 4 ते 8 अंडी, तर क्वचित 10 अंडीसुद्धा घालते. एवढी अंडी हा इवलासा पक्षी कशी काय उबवेल ? नर आणि मादी दोघंही मिळून एकाच वेळेस निम्मी-निम्मी अंडी उबवतात. सुमारे 14 दिवसांच्या उबवणीकाळांनंतर अंड्यातून पिलं बाहेर येता. पिलांना फक्त शाकाहारच दिला जातो. आई- बाबा दोघंही पिलांना भरवतात. 8 ते 10 पिलांना भरवताना दोघांचीही तारांबळ उडते. कुणा-कुणाला भरवू असे होते ! सगळेच सतत खायला मागत असतात. एकाच्या अगदी पाठीवरच आई किंवा बाबा चढतात. दुस-याला भरवतानाही दिसतात. 18 ते 19 दिवसांनी पिलं घरे सोडतात. घरट्यातून बाहेर पडलेली पिलं काही दिवस आई-बाबांसोबतच राहतात. काही दिवस तरी दिवसभर आई- बाबांबरोबर खाद्य शोधत फिरल्यानंतर पिले संध्याकाळी परत घरट्यात येताता. घरट्यात एकच गर्दी होते. आई- बाबा व पिलांसह डझनभर पक्षी घरट्याच्या आत कसे काय जातात हे नवलच वाटते ! आत गेल्यावर थोडा वेळ गोंधळ चालतो. सगळे आत आल्यावर घरट्याचे दार आजू-बाजूचे गवत ओढून बंद केले जाते. सकाळ झाल्यावर एका मागोमाग एक असे घरट्यातून ते बाहेर पडतात. पहिला बाहेर पडलेला पक्षी शेजारच्या झुडपात किंवा झाडाच्या फांदीवर बाकीच्यासदस्यांची वाट बघतो. सगळे घरट्यातून बाहेर पडल्यावर एकत्र उडत चरायला निघून जातात. दिवसभरात घरट्यांच्या आसपासही फिरकत नाहीत. एकदा का त्या भागातले गवतातल्या बिया चरून झाल्या की अख्खा थवा उडून दुसरीकडे चरायला उतरतो. जमिनीपासून 5 फुटावर काय होत असते हे यांना दिसत नसतं. जवळच्याच एखाद्या झाडाच्या फांदीवर बसलेला वेडा राघू मधमाश्या, चतुरसारख्या कीटकांवर नजर लावून बसलेला असतो. ससाणा किंवा इतर शिकारीचा कुठलाही धोका जाणवला की ‘टीर !टीर !टीर !’ आवाज करून जमिनीवरच्या मुनियाला सावध करतो. बदल्यात वेडा राघूला काय मिळते ? तर जमिनीवर चरताना मुनियांच्या हालचालींमुळे उडणारे कित्येक कीटक मटकावण्याची सुवर्णसंधी ! बघा पक्ष्यांच्या वेगवेगळ्या जातींमध्ये कसे असते सहजीवन.

मुनियाचा दुसरा शत्रू आहे माणूस ! हे पक्षी धान्य खातात, पिकांचे नुकसान करतात म्हणून काही देशात तर चक्क मुलांना या पक्ष्यांची घरटी नष्ट करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. काही देशात तर यांना खाल्लेही जाते आणि पाळण्यासाठी पिंज-यात भरून ते विकलेही जातात.

ठिपकेवाला मुनियाच्या गरीब स्वभावाचा फायदा घेणारा एक पक्षी आहे. तो म्हणजे चिमणी. मुनियाचे घरटे बांधून झाल्यावर नर चिमणा या घरट्याचा ताबा घेतो. मुनियाला तिथून हाकलून देतो. चिमणी त्याला हव्या त्या पिसांचा थर देऊन घराची डागडुजी करते. ठिपकेवाला मुनिया आपल्या घरट्याजवळच बसून आपली चोच वाजवून या आयत्या घरट्यात घरोबा करू पहाणा-या चिमणीला निघून जायचा इशारा करतात. उडत जाऊन त्यांच्यावर चाल करतात. तर एरवी ठिपकेवाल्या मुनियाने सोडून दिलेले घरटे उंदीरमामा ताबा घेतात. आपला संसार थाटतात. बघितलं, निसर्गात काहीच वाया जात नाही.

संकलनः दैनिक लोकसत्ता

# बँके संबंधी काही अंग्रेजी शब्दांचे अर्थ



श्री निशिकांत अभ्यंकर

बैंकेत गेल्यावर आपल्याला अनेक गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता असते. बैकेतील इंग्रजी मध्ये वापरण्यात येणारे काही संक्षेप व त्याचे स्पष्टीकरण याचा आपल्याला अर्थ बोध व्हावा या निमितानेः-

SB-Saving Bank

बचत खाते- ग्राहकाने आपले पैसे भरून बँकेत उघडलेले खाते. येथून बँक व ग्राहक यांचे नाते प्रस्थापित होते.

CD-Current Account

चालू खाते धंदा व्यवसायासाठीचे व्यवहार या खात्यामार्फत करायचे असतात. यास व्याज मिळत नाही.

RD -Recuring Deposit

आवर्ती जमा -यामध्ये दरमहा ठराविक रक्कम खात्यात भरून ठराविक मुदतीनंतर व्याजासह मुद्दल घेता येते. या खात्याने बचतीची चांगली सवय लागते.

TD-Term Deposit Fixed Deposit

मुदत ठेवी-ठराविक मुदतीपर्यंत एकरकमी पैसे बँकेत ठेवता येतात. मुदत संपल्यावर सव्याज रक्कम मिळते. मुदतीनुसार व्याजदरात बदल होत जातो.

TDS - Tax Deduction at Source-

एका व्यक्तीच्या एका बँकेतील मुदत ठेवींवर मिळणारे व्याज जर एका वार्षिक वर्षात दहा हजार रुपयांपेक्षा जास्त झाले, तर त्यामधून करकपात होते व उरलेली रकम खातेदारास दिली जाते.

KYC- Know Your Customer-

बँकेत कुठलेही खाते काढण्यापूर्वी प्रत्येक वेळी हा फॉर्म भरावा लागतो. त्यामध्ये खाते काढू इच्छिणा-या व्यक्तीची सर्व माहिती असते.

CRR- Cash Reserve Ratio-

रोखता राखीव प्रमाण-बँकेत सर्व लोकांनी ठेवलेल्या एकूण ठेवीपैकी जी रक्कम बँकेला सरकारच्या खाती ठेवावी लागते, त्यास CRR म्हणतात.

SLR- Statutory Liquidity Ratio-

बँकेच्या एकूण ठेवीपैंकी काही रक्कम सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणे बँकावर बंधनकारक असते. त्याची टक्केवारी म्हणजे 'वैधानिक तरलता प्रमाण' SLR.

E or S - Either or Survivor-

दोन व्यक्तींच्या संयुक्त खात्याचा वापर करताना E or S अशी सूचना देता येते. याचा अर्थ दोघांपैकी कोणीही खाते चालवू शकते आणि एकाच्या मृत्यूनंतर तो अधिकार उरलेल्या व्यक्तीस आपोआप प्राप्त होतो.

F or S- Former or Survivor-

दोन व्यक्तींच्या खात्यातील ही एक खातेवापराची सूचना. पहिली व्यक्ती जो पर्यंत हयात आहे तोपर्यंत पहिल्या व्यक्तीच्या सहीने आणि त्याच्या मृत्यूनंतर उरलेल्या व्यक्तीच्या सहीने खाते चालवता येते.

Jt. Joint- संयुक्त-

दोन अथवा जास्त व्यक्तींचे खाते जेव्हा दोन अगर जादा लोकांच्या सह्यांनी वापरले जाते, त्यास Jt. ऑपरेशन म्हणतात.

SI-Standing Instructions-

खातेदार बँकेला काही सूचना देतो. एखाद्या ठराविक तारखेस ठराविक रक्कम एका खात्यातून दुस-या खात्यात वर्ग करावयाच्या लेखी सूचनेस SI म्हणतात. त्यानुसार काम करण्यास बँक बांधील असते.

Dr. -DEBIT-नावे टाकणे-

कुठल्याही खात्यातून पैसे काढताना ते शिलकीतून वजा होतात. त्यास नावे टाकणे म्हणतात. म्हणजे तेवढ्या रकमेने खात्यातील शिल्लक कमी होते.

Cr.- CREDIT-जमा करणे-

जेव्हा खात्यात रक्कम भरली जाते, जमा होते, त्यास रक्कम Credit करणे म्हणतात.

PAN- Permanent Account Number-

प्रत्येक व्यक्तीस सरकारच्या प्राप्तिकर खात्यातर्फे हा नंबर एका कार्डावर नमूद करून दिला जातो. बँकेत खाते उघडताना ते कार्ड दाखवून स्वत:ची ओळख देता येते.

Cr. Bal.- बचत खाते,

मुदत ठेवीचे खाते- यांमधील शिल्लक Cr. Bal. जमा शिल्लक म्हणून दाखवली जाते. याचा अर्थ तेवढी रक्कम बँक, खातेदारास देण्यास बांधील आहे.

Dr.Bal.-कर्ज खात्यांची शिल्लक- म्हणजे नावे शिल्लक होय. म्हणजे तेवढे पैसे बँकेने खातेदारास कर्जरूपात दिलेले असून. ते खातेदाराकडून बँकेला येणे आहे.

Clg- Clearing-

समाशोधन-एकाच गावातील वेगवेगळ्या बँकांचे वेगवेगळ्या शाखांचे चेक ज्या पद्धतीने एकमेकांना दिले घेतले जातात, त्यास Clearing म्हणतात.

Tra- Transfer-

अंतरण- एकाच बँकेच्या कुठल्याही शाखेच्या एखाद्या खात्यातून जेव्हा काही रक्कम त्याच बँकेच्या दुस-या कुठल्या अथवा त्याच शाखेतील एखाद्या खात्यात टाकली जाते, त्या व्यवहारास Transfer व्यवहार म्हणतात. एका खात्यात नावे Dr. तर दुस-या खात्यात जमा Cr. होते. बँक एकच.

PAP- Payable at Par-

एखाद्या बँकेचा धनादेश जेव्हा दुस-या बँकेत भरला जातो आणि क्लिअरिंगमधून पास करायचा असतो तेव्हा त्या गावच्या क्लिअरिंग हाउस परिघात तो वटवता येतो. उदा. Payable at par at all branches in Pune Mumbai...याचा अर्थ पुणे, मुंबईच्या क्लिअरिंग हाऊसमधून हा चेक वटवता येईल.

ECS- Electronic Clearing Service-

एखाद्या खात्यातून रक्कम काढून दुसरीकडे पाठवायचे काम इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे संगणकीय सुविधेमार्फत केले जाते. उदा. वीजबिल, फोनबिल भरणे, एकदा ECS चा फार्म भरून दिला, की दरमहाचे बिल आपोआप खात्यातून घेतले जाते. तसेच कुठले पैसे येणार असतील, उदा. म्युचुअल फंड, शेअर्स गुंतवणूक तर ते पैसे ECS द्वारे खात्यात जमा होतात. Credit होतात.

CBS- Core Banking Solution-

बँकांच्या शाखांची अंतर्गत संगणकीय जुळवणी पूर्ण झाली, त्यास CBS शाखा म्हणतात, त्यामुळे एखादा खातेदार त्या ठराविक शाखेचा न राहता त्या बँकेचा झाला आहे.

DD-Demand Draft-

बँकेच्या एका शाखेने त्याच बँकेच्या दुस-या शाखेवर एका ठराविक व्यक्तीला त्यावर लिहिलेली रककम द्या, अशा अर्थाची काढलेली नोटिस.

P/s. P/o.- Payslip/Pay order/Bankers cheque-

एकाच गावात पैशाची खात्रीशीर देवाण घेवाण करताना बँकेच्या धनादेशाने पैसे देणे उत्तम असते.

MT -Mail Transfer-

बँकेच्या एका शाखेतून दुस-या शाखेंतील एखाद्या खातेदाराच्या खात्यात पैसे पाठवताना मेल ट्रांन्सफर करतात. संगणकीय जोडणी झाल्याने MT करायची वेळ येत नाही. कुठल्याही शाखेतील कुठल्याही खात्यात कुठल्याही शाखेतून पैसे, चेक भरणा करता येतो.

TT.- Telegraphic Trasfer-

TTद्वारे पैसे पाठवताना एका शाखेकडून दुस-या शाखेतील खात्यात लवकरात लवकर सांकेतिक भाषेत पैसे पाठवून धनप्रेष (Remittance) करता येतो.

TC.- Travellers Cheque-

प्रवास करताना रोख रक्कम बाळगायची जोखीम वाटते. अशे वेळी TC विकतघेऊन ठेवावेत. प्लॅस्टिक कार्डच्या वापरामुळे TC कमी प्रमाणात वारले जातात.

MCC.-Multi City Cheque-

खाते एका (अ) गावात आहे, परंतु तो चेक इतर गांवांमध्ये (B.C.D..) जणू काही त्याच गावातल्या शाखेचा असल्यासारखा वटवता येतो. त्यास MCC म्हणतात.

RTGS-Real Time Gross Settlement-

या पद्धतीने धनप्रेष (Remittance) करताना अत्यंत जलद गतीने एका बँकेच्या एका खात्यातून दुस-या बँकेच्या दुस-या गावच्या दुस-या देशाच्या खात्यात पैसे वर्ग ट्रांन्सफर करता येतात.

IFCI- Indian Financial System Code-

RTGs द्वारे पैसे पाठवताना ज्या शाखेत पैसे पाठवायचे त्या शाखेचा ठराविक कोड नंबर (IFSC) माहीत असायलाच लागतो. तो धनप्रेष अर्जात नमूना करावा लागतो.

INFINET-Indian Financial Network-

नावावरूनच कळते की आर्थिक व्यवहाराशी निगडित असलेली संगणकीय जुळणी.

ATM- Automated Teller Machine - Any Time Money-असे जरी लक्षात ठेवले तारी चालेल. रस्त्यात ATM बसवलेले दिसतात. आठवड्याचे सातही दिवस आणि दिवसाचे चोवीस तास पैसे काढायची सुविधा.

PIN- Personal Identification Number-

गुप्त सांकेतिक क्रमांक. PIN कुणाला सांगायचा नसतो आणि वरचेवर बदलून लक्षात ठेवायचा असतो.

SMS- Short Messaging Service-

मोबाईल बँकिंगमध्ये खात्यात एखादा व्यवहार झाला, तर मोबाईलवर मेसेज- निरोप येतो.

EFT- Electronic Funds Transfer-

इंटरनेटद्वारा एका खात्यातून दुस-या खात्यात पैसे वर्ग करणे. त्यासाठी स्थायी सूचनासुद्धा देता येतात. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारा

अत्यंत जळद व सुरक्षित अशी पैसे पाठवायची सोय.

SDV- Safe Deposit Vault- सुरक्षा जमा कक्ष-

बँकेतील सेफमधला एक कप्पा भाड्याने घ्यायचा आणि त्यामध्ये मौल्यवान वस्तू दागदागिने ठेवायचे. काय ठेवले आहे ते फक्त ठेवणा-यालाच माहीत असते.

BOE- Bill of Exchange-

देणेकरी आणि घेणेकरी यांच्या व्यवहाराची लिखापढी केलेला कागद.

MICR-Magnetic Ink Character Recognition-

चेकचा एक प्रकार. Non MICRआणि MICR असे दोन चेकचे प्रकार. क्लिअरिंगचे चेक्स वेगवेगळे करण्यासाठी याचा उपयोग होतो.

IBC-Inward Bill of Collection-

बाहेरच्या एका पार्टीने बँकेच्या खातेदारावर काढलेले बिल काही इतर कागदपत्रांसह वसुलीसाठी बँकेत पाठवलेले असते.

OBC- Outward Bill of Collection-

बँकेच्या खातेदाराने बाहेरच्या पार्टीकडून वसुली करण्यासाठी बँकेत दिलेले बिल व इतर कागदपत्र.

MICR Code-

बँडवर बरेच नंबर असतात.सुरवातीचा ओळीने येणारा नंबर. नंतरचा ९ आकडी नंबर म्हणजे त्या बँकेचा, त्या शाखेचा MICR Code. उदा. ४११०१३०११. ४११ हा पुण्याचा पोस्टाचा पिन नंबर. नंतर ०१३ हा बँक ऑफ इंडियाला म्हणजे बँक ऑफ इंडिया कर्वे रोड शाखा, पुणे.

EMI- Equated Monthly Instalment-

कर्ज घेतल्यावर कर्जदाराचा पगार, आवक, खर्च परतफेडीचा कालावधी, कर्ज रक्कम आणि शिल्लक याचा एकत्रित विचार करून कर्जफेडीचा ठरवलेला हप्ता.

MICR band-

कुठल्याही धनादेशाला खालील १०५ से.मी. चा पांढरा पट्टा असतो. तोच MICR Band त्यावर काहीही लिहायचे नाही.

PDC- Post Dated Cheque-

पुढील भविष्यातील तारीख घालून दिलेला चेक. हप्त्यावर खरेदी करताना असे चेक द्यावे लागतात.

WAE- Withdrawal against Effect-

खात्यात जमा केलेला चेक वटायच्या आधीच त्यातले पैसे काढणे. त्यासाठी वेगळा आकार(Charges) लावला जातो.

D/L- Demand Loan-

ते मागणी केल्यावर फेडावे लागणारे कर्ज.

BPLR- Benchmark Prime Lending Rate-

सर्व प्रकारच्या कर्जांचा व्याजदर BPLR वर निर्धारित असतात.

SHG- Self Help Group-

बचतगट- एकाच वस्तीतील काही लोकांनी एकत्र येऊन बनवलेला संघ.

PPO- Pension Payment Order-

निवृत्तीनंतर मिळणा-या पेंशनचा हिशोब आणि सर्व माहिती नमूद केलेला कागद. हा कागद जपून ठेवावा लागतो.

POS- Point of Sale-

डेबिट क्रेडिट कार्ड स्वाइप करण्यासाठी member establishment (दुकानदार) वापरात असलेले मशीन.

MCSC-Master Card Secure Code-

डेबिट क्रेडिट कार्डांमध्ये कार्ड होल्डरची संपूर्ण माहिती या नंबरमध्ये केंद्रित केलेली असते.

CVV- Card Verification Value-

डेबिट क्रेडिट कार्ड स्वाइप केल्यावर सर्व माहिती तपासून त्या ठराविक व्यवहारासाठी आवश्यक असलेली अधिकृतता.

PAM- Personal Assurance Message-

डेबिट क्रेडिट कार्ड स्वाइप करीत असताना ज्या बँकेचे ते कार्ड आहे त्या बँकेस पैसे देण्याची कार्डधारकाने दिलेली खात्री.

CMB- Cash Management Bills-

डेबिट क्रेडिट कार्ड स्वाइप केल्यावर दुकानदारास ग्राहकाकडून पैसे मिळाल्याची एक प्रकारची खात्री म्हणजेच ग्राहकाने सही करून दिलेली चार्ज स्लीप.

NABARD- National Bank for Agriculture and Rural Development-कृषी व राष्ट्रीय ग्रामीण विकास बँक.- संस्थेने कायदा करून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धर्तीवर कृषी व ग्रामीण विकासासाठी स्थापन केलेली शिखर बँक.

UID- Unique Indentification-

प्रत्येक बँकेला रिझर्व्ह बँकेने अधिकृतपणे ठरवून दिलेला कोड.

CCEA- Cabinet Committee on Economic Affairs-

आर्थिक घडामोडींसाठी विचारविनिमय करणारी केंद्रीय समिती.

IFRS- International Financial Reporting System-

आर्थिक व्यवहरांची नोंदणी करण्यासाठी एकत्रितपणे येऊन काम करण्याची आंतरराष्ट्रीय पद्धत.

BPR- Business Process Re-Engineering-

एखाद्या संस्थेच्या उन्नतीसाठी सातत्याने राबविण्यात येणारी संशोधक कार्यप्रणाली आणि त्यानुसार बदल करण्याची सततची प्रक्रिया.

DRDA-District Rural Development Agency-

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.

प्रत्येक जिल्ह्यामध्ये ग्रामीण विकासासाठी काम करणा-या वेगवेगळ्या संस्थांमध्ये समन्वय स्थापित करणारी राज्य सरकारी

यंत्रणा.
LB- Lead Bank-अग्रणी बँक, प्रत्येक जिल्हास्तरावर प्राधान्यक्रम क्षेत्रांना व सरकारपुरस्कृत विविध योजनांखाली दिलेल्या अर्थपुरवठ्याची माहिती संकलित करून त्याचा आढावा घेणारी यंत्रणा.
BLBC- Block Level Bankers Committee-
गट स्तरावरील बँकांची समिती. लीड बँक योजनेखाली कामकाजाचा आढावा घेणारी समिती.
MIS- Management Information System-
बँकाचे नेटवर्किंग, संगणकीकरण, सीबीएस मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याने काही मिनिटांतच बँकेच्या संपूर्ण आर्थिक परिस्थितीचे चित्र MIS मुळे स्पष्ट होते.
DLCC-District level Consultative Committee-
रिव्ह्यू कमिटी. जिल्हास्तरीय परामर्श समिती/ पुनरावलोकन समिती. जिल्हा स्तरावर सरकारी योजनांना दिलेल्या अर्थपुरवठ्याचा दर तिमाहीस आढावा घेणारी समिती.
SLBC- State Level Bankers Committee-
राज्य स्तरीय बँकांची समिती. राज्यामध्ये कार्यरत असणा-या विविध योजनांना दिलेल्या अर्थपुरवठ्याचा दर सहामाहीस आढावा घेणारी समिती.
BPL- Below Poverty Line-
दारिद्र्य रेषेखालील. सरकारी यंत्रणेने निर्धारित केलेल्या आर्थिक निकषांनुसार दारिद्र्य रेषेखाली जीवनमान व्यतीत करणारी कुटुंबे.
RCC- Regional Consultative Committee-
क्षेत्रीय परामर्श समिती. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या/ राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील, क्षेत्रीय स्तरावर (अनेक राज्ये एकत्र केलेले क्षेत्र) प्राधान्यक्रम क्षेत्रांना व सरकार पुरस्कृत विविध योजनांना बँकांनी केलेल्या अर्थपुरवठ्याचा आढावा घेणारी समिती.
UCC- Unit Cost Committee-
पीक उत्पादन खर्च निर्धारण समिती.
जिल्हा स्तरावर राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, लीड बँक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, राज्य सरकारचे कृषी खाते व अन्य प्रमुख बँका यांचे प्रतिनिधी असलेली प्रत्येक विकास येणारा उत्पादन खर्च निर्धारित करणारी समिती.
APMC- Agricultural Produce Marketing Committee-कृषी उत्पन्न बाजार समिती-शेती उत्पन्न बाजार समिती कायद्याखाली शेती उत्पादन विक्री करण्यासाठी व्यापारी शेतकरी यांच्यामध्ये समन्वय साधणारी यंत्रणा.
DRI- Differntial Rate of Interest Scheme-
अत्यल्प व्याजदर योजना. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिशानिर्देशानुसार समाजातील अत्यंत दुर्बल घटकांना अत्यल्प व्याजदराने अर्थपुरवठा करण्याची योजना.
DCC- District Central Co-op. Bank-
जिल्हा मध्यवर्ती सरकारी बँक. सहकारी कायद्यानुसार जिल्हा स्तरावर स्थापन केलेली शेती व ग्रामीण विकासासाठी कार्यरत बँक.
LDB- Land Development Bank-
भू-विकास बँक. राज्य सरकारी कायद्यानुसार भू-विकासासाठी पर्थीर्घ मुदतीने व अत्यल्प व्याजदराने अर्थपुरवठा करणारी बँक.
MF- Marginal Farmer- अत्यल्प भू-धारक.
स्वतःच्या मालकीची अडीच एकरापर्यंत जमीन असलेला शेतकरी.
SF- Small Farmer-
अल्प भू-धारक. स्वतःच्या मालकीची अडीच ते पाच एकर जमीन असलेला शेतकरी.
AL- Agricultural Labour- शेतमजूर. इतरांच्या शेतावर मजुरी करून उपजीविका करणारा.
CL- Crop Loan- कर्ज पीक. उत्पादन करण्यासाठी अल्प मुदतीचे बँकेने दिलेले कर्ज-पीक निघाल्याबरोबर या कर्जाची परतफेड व्याजासहित करणे जरूरी असते.
TL- Term Loan- मुदत कर्ज. भांडवली गुंतवणुकीसाठी मध्यम/ दीर्घ मुदतीचे बँकेने दिलेले कर्ज, याची परतफेड समान अर्धवार्षिक/ वार्षिक हप्त्याने दिलेल्या मुदतीत व्याजासहित करावी लागते.
IMF- International Monetary Fund- या संस्थेच्या सदस्य देशाच्या बँकांची मार्गदर्शक संस्था.
FEMA- Foreign Exchange Management- विदेशविनिमय संदर्भातील कायदेकानून.
DGFT- Director General of Foreign Trade- सर्व प्रकारच्या परकीय आयात- निर्यात व्यवहारावर नियंत्रण ठेवणारी एक संस्था.
SWIFT- Society for Worldwide interbank-Financial Telecommunications- ही एक अत्यंत जलद संदेश पाठवणारी सुविधा आहे. जगातील ही सुविधा असलेल्याबँका/ शाखा आपापसातील आदानप्रदान swift द्वारे करतात.
NRI- Non Residential Indian- भारतीय नागरिकत्व असलेली:
NRO- Non Resident Ordinary Account-
परदेशस्थ भारतीय व्यक्तीचे भारतात असलेले रुपयांतील खाते.
NRE- Non Resident External Account-
परदेशी राहणारी व्यक्ती परकीय चलनात धनप्रेष पाठवून त्याचे रूपांतर रुपयांत करून भारतात खाते उघडू शकते.
FCNR- Foreign Currency Non Resident - NRI हे खाते काढतात. परकीय चलनात ही खाती असतात. मुद्दल व

त्यावरील व्याजही परकीय चलनात दिले जाते.
RFC- Resident Foreign Currency Account- परदेशी राहणा-या भारतीयाने भारतात आल्यावर परकीय चलनात काढलेले खाते.
PPF- Public Provident Fund- ही एक प्रकारची बचत योजना आहे. यामध्ये भरलेल्या रकमेवर कर सवलत मिळते.
DEMAT- Dematerialization- शेअर्समध्ये पैसे गुंतवताना बँकेत Demat खाते काढावे लागते.
AMC- Asset Management Company- एखाद्या म्युच्युअल फंडची संपूर्ण व्यवस्था बघणारी कंपनी.
NSDL and CDSL-National Securities Depository Limited and Central Depository Service (India) Limited. इलेक्ट्रॉनिक मोड मधील सिक्युरिटीज या दोन डिपॉझिटरीज्मध्ये ठेवलेल्या असतात.
IPO- Initial Public Offer- कंपनीने प्रथमत: विक्रीस काढलेल्या भागभांडवलाचा पब्लिक इश्यू IPO.
NBFC- Non Banking Financial Company- बँकिगव्यतिरिक्त आर्थिक फायनॉन्शियल व्यवहार करणारी कंपनी.
NI Act- Negoliable Instrument Act- बँकिंगमधला महत्त्वाचा कायदा. चेक, बिल ऑफ एक्स्चेंज, प्रॉमिसरी नोट ही negotiable instruments आहेत.
SEBI- Securities and Exchange Board of India- गुंतवणूकदाराचे भवितव्य आणि हित जपण्यासाठी स्टॉक एक्स्चेंजच्या कार्यावर नियंत्रण करणारी संस्था.
ICICI- Industrial Credit and Investment Corporation of India Limited- ही एक खासगी बँक आहे.
DICGC- Deposit Insurance and Credit Guarantees Corporation- खातेदारांच्या सर्व प्रकाराच्या खात्यांमधील ठेवींना इन्शुरन्स(अभय) देणारी संस्था.
IIBF- Indian Institute of Banking & Finance- बँकांना मार्गदर्शन करणारी, बँकेतल्या लोकांना प्रशिक्षण देणारी, बँकांच्या परीक्षा घेणारी एक संस्था.
NIBM- National Institute of Bank Management- बँकांना मार्गदर्शन करणारी, बँकिंगचा अभ्यास व संशोधन करणारी बँकेतल्या लोकांना प्रशिक्षण देणारी, बँकांच्या परीक्षा घेणारी एक संस्था.
RBI- Reserve Bank of India- सर्व बँकांवर, बँकिंग व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणारी, मार्गदर्शन करणारी सर्वोच्च सरकारी बँक. सर्व बँकांची सर्वेसर्वा असणारी.

साभार: साप्ताहिक सकाळ

# साजुक तूप



**को**कणस्थ ब्राह्मण व तूप याचे जिवा भावाचे नाते आहे. लहानपणी माझी आई भाजी नसली तर खुशाल तूप गुळ पोळी जेवायला वाढायची. गोड वरण, भात व लिंबू असले कि त्याबरोबर तूप हे आलेच. तसेच साजुक तुपाचा परोठा, शिरा, डींकाचे व मेथिचे लाडू असे अनेक पदार्थ आपण घरी करतो वा विकत आणून खातो. परन्तु या साजुक तुपा विषयी व त्याच्या गुणधर्माविषयी आपणांस माहिती आहे का?

१) तुपात व्हिटॅमिन अ, ड आणि ई असे जीवनसत्वे आढळतात तसेच तूप हे एन्टीऑक्सिडंटस असून शरीरात फ्री रॅडिकल्स पासून होणा-या गंभीर दुखापतींवर मात करतात.

२) शरीरातील फ्री रॅडिकल्स तुपा मधील बीटा कॅरोटिन ने कमी होतात.

३) तूप सर्व स्निग्घात उत्तम आहे.स्मृती, ग्रहणशक्ती, ताणशक्ती व बळ वाढविणारे आहे.

४) पाचनास सहज व सोपे. भरपूर काळ टिकणारे असल्याने साठविता येते.

५) त्वचेचे व केसांचे आरोग्यास उत्तम.

६) मेंदूला पोषक व शरिराचे तापमान योग्य राखण्यास मदत करते.

७) डोळ्यांच्या आरोग्यास उत्तम.

८) रोज दोन किवा तीन चमचे तूप खाल्यास हरकत नाही. तूप खाल्यास शरीरातील चरबी वाढते हे चूक आहे.गरम दूध व तूप घेतल्यास बद्धकोष्ठता कमी होण्यास मदत होते.कावीळ, क्षय रोगात, रक्त क्षय असल्यास आहारात तूप अवश्य वापरावे.

# उपयुक्त लिंक्स



**शिल्पा विवेक अभ्यंकर**

**इं**टरनेट म्हणजे भूलभूलैया आहे. रिकाम्या डोक्याने संगणकावर जाऊन बसलं आणि इंटरनेट चालू केलं की माणूस ज्ञानप्रलयातल्या कुठल्या तरी भोव-यात अडकतो आणि किनाराच हरवून बसतो. हा अनुभव जी मंडळी नियमितपणे नेटसफर करतात त्यांना पाठ झालेला आहे. या भोव-यात हरवण्यात कित्येक तास निघून जातात. एकीकडे तास जातात, दुसरीकडे इंटरनेटचं बिल वाढतं आणि तिसरीकडे एवढं करूनही हातात फारसं काही आलेलं नसतं. हा अनुभव येऊ नये यासाठी उत्तम वेबसाइटसूची विषयावर यादी दिसली की तुम्ही-आम्ही मंडळी त्यावर झडप घालतो. त्या यादीतून कधी कधी चांगली हिरे-माणके आपल्या हाती लागतात. आज अशा काही उपयुक्त साइट्स वा लिंक्स तुमच्यापुढे मांडाव्यात यासाठी हा लेख.

पहिली लिंक सांगण्यापूर्वी त्याची थोडी प्रस्तावना करणं आवश्यक आहे. सध्याचा काळ असा आहे की, आपलं घर असो की आपलं कार्यालय, घरात इलेक्ट्रॉनिक आणि विजेवर चालणा-या वस्तूंची रेलचेल असते. टीव्हीपासून ते म्युझिक सिस्टीमपर्यंत आणि स्वयंपाकघरातल्या मिक्सरपासून ते वॉशिंग मशीनपर्यंत अनेक गोष्टी असतात. मोबाईल तर प्रत्येकाच्याच खिशात असतो. खेरीज कॅल्क्युलेटर्स, आपल्या संगणाकाच्या माऊसपासून ते फॅक्स मशीनपर्यंत अनेक गोष्टी असतात. जेव्हा या वस्तू नव्याने आपल्या घरात येतात, तेव्हा आपलं लक्ष त्या वस्तूकडे असतं. चकचकीत नव्या रूपातली ती देखणी वस्तू आपण कधी एकदा हाताळतोय, वापरायला सुरुवात करतोय इकडे सारं ध्यान एकवटलेलं असतं. पुढे कधीतरी ती वस्तू जुनी होते. अचानक बिघडते. या टप्प्यावर मग आपल्याला आठवण होते ती त्या वस्तूच्या 'मॅन्युअलची' किंवा 'युजर गाइडची'. त्या युजर गाइडमध्ये बिघाड कसा दूर करावा याच्या टिप्स दिलेल्या असतात आणि त्याच आपल्याला हव्या असतात. 'ट्रबल शूटिंग' या शीर्षकाखाली ते तंत्र आणि मंत्र कधीतरी पाहिलेले आपल्याला आठवत असतात. पण झालेलं असं असतं, की बाकी सर्व आठवत असून ते मॅन्युअल किंवा युजर गाइड कुठे ठेवलंय हे काही आठवत नसतं. कपाट, ड्रॉवर्स, बॅगा, फाइल्स वगैरे धुंडाळून आपण शेवटी हरतो. ते मॅन्युअल काही हाती लागत नसतं आणि त्यावाचून तर सारं अडलेलं असतं. मंडळी, अशा परिस्थितीत हमखास कामी येणारी वेबसाइट म्हणजे www.safemanuals.com या साइटवर सर्वप्रकारच्या युजर गाइडचा संग्रह उपलब्ध आहे. एकूण 8,83,542 एवढी युजर गाइड्स तिथे उपलब्ध आहेत. असा त्या साइटचा दावा आहे. आपली वस्तू ज्या कंपनीची आहे त्या कंपनीनुसार किंवा वस्तूच्या प्रकारानुसार(डिजिटल कॅमरा, लेझर प्रिंटर वगैरे) किंवा एकूणच हवा तसा सर्च करून युजर गाइड शोधण्याची सोय या साइटवर आहे. या साइटचे नाव आपल्या संग्रहात हवे. कधी तिची गरज लागेल हे सांगणं अवघड.

दुसरी लिंक माझ्यासमोर आहे ती www.myproductadvisor.com ही. एखादी वस्तू जेव्हा मला विकत घ्यायची असते तेव्हा दुकानात वा मॉलमध्ये जाण्यापूर्वी माझे ज्ञान वाढवणारी ही साइट आहे. समजा, मला मोबाईल फोन विकत घ्यायचा आहे तर मी phone वर क्लीक करायचं. ही साइट मग मला वेगवेगळे प्रश्न विचारते. म्हणजे त्या फोनमध्ये तुला कॅमरा हवा आहे का ? त्यातून इमेल वगैर पाठवायची आहे का ? इंटरनेट हवं आहे का?किती किमतीपर्यंत ती वस्तू घ्यायची आहे? एखादा विशिष्ट ब्रॅण्ड किंवा कंपनी डोळ्यांसमोर आहे का ? तुमचे वय किती आहे? वगैरे, वगैरे. तुम्ही सर्वच प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत असं नाही. पण जेवढ्या प्रश्नांची उत्तरं तुम्ही द्याल त्यावर आधारित तुम्हाला हव्या त्या बजेटची, किंमतीची, कंपनीची, लाइफस्टाइलची वस्तू ही साइट तुम्हाला सुचवते. यातली किंमत अर्थातच अमेरिकन डॉलरची असते पण आपण त्याचे रूपांतर रुपयांत करून घ्यायचे आणि नंतर हवा तो बोध त्यातून घ्यायचा. एखादी उपयुक्त टीप या साइटने आपल्याला दिली तरी खूप झालं.

तिसरी लिंक आहे. आपल्या दैनंदिन जीवनातल्या साध्या-साध्या गोष्टींचा नवा उपयोग सांगणारी. इंटरनेटवर अनेक ब्लॉग्जनी या लिंकचा उल्लेख केल्याने ही लिंक चांगली लोकप्रिय झाली आहे. www.realsimple.com/realsimple/gallery/0,21863,1030084-1,00,html. हा लिंकचा पत्ता लांबीला थोडा मोठा असला तरी तेथील माहिती फार उपयुक्त आहे. लिंबू, वर्तमानपत्र, कॉफी फिल्टर, ऑलिव्ह आईल, बेकिंग सोडा, व्हिनेगार, वेलक्रो, खाण्याचं मीठ वगैरेंचे एकूण 101 नवे उपयोग

या साइटने सांगितले आहेत. मुळात Realsimple.com ही साइट life made easier या ब्रीदवाक्याने चालत असते. त्यांनी सांगितलेले 101 नवे उपयोग गमतीदार आहेत. उदाहरणार्थ भरपूर मीठ घातलेलं गरम पाणी ड्रेनेजमध्ये ओतल्यास चोक-अप झालेले ड्रेनेज मोकळे होते किंवा दाढीचे क्रीम संपले असेल तर त्या जागी ऑलिव्हि ऑईल वापरल्यास दाढी उत्तम होते वगैरे वगैरे. या 101 उपयोगांवर नजर टाकून त्यातले काही आपल्या कामी येतात का, हे पाहायला हरकत नाही.

चौथी लिंक www.fixitclub.com/ तर चांगलीच कामाची आहे. एकूण 175 प्रकाराच्या घरगुती दुरुस्त्या तिथे शिकवल्या आहेत. त्यात तुमच्या डीव्हीडी प्लेअर रिपेअरपासून ते इलेक्ट्रिक ओव्हन रिपेअरपर्यंत बरंच काही आहे. यात वस्तूंची दुरुस्ती करताना नेमकी कशी करावी, हे सांगताना अनेक छायाचित्रे देऊन दाखविलेलं असल्याने नेमकी कृती समजण्यास सोपी जाते.

पाचवी लिंक फार गमतीदार आहे. तिचं नाव आहे www.thistothat.com आता हे धीस टू दॅट नेमकं काय आहे हे सांगायला हवं. धीसच्या बाजूला सिरमिक, फॅब्रिक ग्लास, लेदर, मेटल, पेपर, प्लास्टिक, रबर, फोम, विनायल आणि लाकूड एवढ्या गोष्टी आहेत. दॅटच्या बाजूलाही या सर्व गोष्टी आहेत मग धीस टू दॅट म्हणजे काय? उत्तर सोपं आहे. काहीही कशालाही चिकटवा. Lets glue, म्हणजे काचेला लाकूड चिकटवा किंवा रबराला धातू चिकटवा किंवा प्लास्टिकला फॅब्रिक चिकटवा. काहीही कशालाही कसं चिकटवायचं हे thistothat.com आपल्याला सांगते. त्यासाठी कोणते विशिष्ट गोंद किंवा रसायनं वगैरे उपलब्ध आहेत, त्यांना काय म्हणतात वगैरे माहिती तिथे मिळते. मुद्दाम पाहावी आणि लक्षात ठेवावी अशी ही साइट.

सहावी उपयुक्त साइट म्हणजे www.friendlyplumber.com/plumbing101.html. नावावरून तुमच्या लक्षात आलं असेल की घरच्या प्लंबिंगच्या कामाबद्दल माहिती देणारी ही साइट आहे. पाइप, नळ, वायसर, टॉयलेट वगैरे विषय इथे उत्तम प्रकारे चर्चिले गेले आहेत. USA TODAY सारख्या दैनिकाने या साइटला हॉट साइट म्हणून गौरविले होते. त्यावरून त्याच्या उपयुक्ततेची कल्पना तुम्हाला येईल. इंटरनेटवर खरं तर अशा प्रकारच्या शेकडो साइट्स आणि लिंक्स् तुम्हाला दिसतील. वर दिलेल्या लिंक्स या त्यातल्या काही ठळक आणि खास गौरविल्या गेलेल्या म्हणूनच त्यांची नोंद ठेवण्यासाठी म्हणून इथे आवर्जून दिलेल्या आपल्या नेहमीच्या विषयातून बाजूस होऊन त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकला तर थोडं विषयांतर आणि थोडं मनोरंजन असं दोन्ही होऊ शकतं.

आता रोजगारविषयक साप्ताहिकांमध्ये विविध सरकारी खाती किंवा आस्थापनांमधील नोक-यांच्या ज्या जाहिराती असतात, त्यांच्याविषयीची अधिक माहिती खालील वेबसाइट्सच्या माध्यमांतून जाणून घेता येईल.

## शैक्षणिक

- विद्यापीठ अनुदान आयोग www.ugc.ac.in
- केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ www.cbse.nic.in
- दिल्ली विद्यापीठ www.du.ac.in
- जवाहरलाल नेहरू विद्यापीठ www.jnu.ac.in
- राष्ट्रीय शिक्षक अध्यन परिषद www.ncte.in.org
- राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद www.ncert.nic.in
- मनुष्यबळ विकास खाते (शिक्षण) www.education.nic.in

## ॲव्हिएशन

- महासंचालक, नागरी उड्डाण www.dgca.nic.in
- आयएटीए प्रशिक्षण www.iata.org
- नागरी उड्डाण खाते www.civilaviation.nic.in
- इंदिरा गांधी राष्ट्रीय उड्डाण अकादमी www.igrua.gov.in

## बँकिंग

- रीझर्व्ह बँक ऑफ इंडिया www.rbi.org.in
- स्टेट बँक ऑफ इंडिया www.statebankofindia.com
- पंजाब नॅशनल बँक www.pnbindia.com
- कॉर्पोरेशन बँक www.corpbank.com

## नागरी सेवा

- केंद्रीय लोक सेवा आयोग www.upsc.gov.in
- स्टाफ सिलेक्शन कमिशन ssc.nic.in
- डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲण्ड ट्रेनिंग www.dopt.nic.in

## संरक्षण

- राष्ट्रीय संरक्षण अकादमी www.nda.nic.in
- भारतीय लष्कर www.indianarmy.nic.in

- संयुक्त भारतीय लष्कर www.joinindianarmy.nic.in
- भारतीय हवाई दल www.indianairforce.nic.in
- भारतीय नाविक दल www.indiannavy.nic.in

## अभियांत्रिकी

- अखिल भारतीय तांत्रिक प्रशिक्षण परिषद www.aicte.ernet.in
- द इन्स्टिटयूशन्स ऑफ इंजिनीअर्स (भारत) http:// www.ieindia.org
- आयआयटी - खरगपूर www.iitkgp.ac.in
- ब्यूरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी www.bee.gov.in
- डिस्टन्स एज्युकेशन कॉन्सिल फॉर डिस्टन्स एज्युकेशन इन इंजिनिअरिंग www.dec.ac.in
- जॉइंट एन्ट्रन्स एक्झाम (ओरिसा) www.jeeorissa.com

## फायनान्स

- द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स www.icai.org
- द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया www.icsi.edu
- नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया www.nseindia.com
- बॉम्बे स्टॉक एक्सचेंज www.bseindia.com
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनान्स www.iibf.org.in
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्स www.isical.ac.in

## हॉस्पिटॅलिटी

- इनक्रेडिबल इंडिया www.incredibleindia.org
- पर्यटन विभाग www.turisminindia.com

### माहिती तंत्रज्ञान

- नास्कॉम www.nasscom.in
- माहिती तंत्रज्ञान खाते www.mit.gov.in
- सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स कॉम्प्युटिंग www.cdac.in

## कायदा

- भारताचे सर्वोच्च न्यायालय www.supremecourtofindia.nic.in
- कायदे आणि न्याय खाते www.lawmin.nic.in
- राष्ट्रीय महिला आयोग www.ncw.nic.in
- केंद्रीय प्रशासकीय लवाद www.cgat.gov.in

## ग्रंथालय शास्त्र

- राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन www.rrrlf.nic.in
- नॅशनल आर्काइव्हज ऑफ इंडिया www.nationalarchives.gov.in

## व्यवस्थापन

- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया कोलकाता www.iimcal.ac.in
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया अहमदाबाद www.iimahd.ernet.in

### प्रसारमाध्यमं

- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन www.iimc.nic.in
- पब्लिकेशन विभाग www.publicationsdivision.nic.in
- दूरदर्शन www.ddindia.com
- डायरेक्टरेट ऑफ ॲड्व्हर्टायजिंग ॲण्ड हिज्युअल पब्लिसिटी www.dvap.nic.in
- प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो www.pib.nic.in

## वैद्यकीय

- आरोग्य आणि सार्वजनिक कल्याण खाते www.mohwf.nic.in
- आयुष www.indianmedicine.nic.in
- राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था www.nacoonline.org
- आर्मड् फोर्सेस मेडिकल कॉलेज www.armedforces.nic.in

## रेल्वे

- भारतीय रेल्वे www.indianrail.gov.in
- रेल्वे खाते www.railnet.gov.in
- भारतीय रेल्वे कॅटरिंग ॲण्ड टुरिझम कॉर्पोरेशन www.irctc.co.in

### स्वयंरोजगार

- सेंट्रल मरीन फिशरीज रीसर्च इन्स्टिट्यूट, कोची www.cmfri.com
- टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई www.tiss.edu

- मिनिस्ट्री ऑफ लेबर ॲण्ड एम्प्लॉयमेंट, ॲड्व्हान्सड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट http:// dget.nic.in/atikanpur

## फार्मसी

- ॲकॅडमी फॉर क्लिनिकल एक्सलन्स www.aceindia.org
- इन्स्टिट्यूट ऑफ क्लिनिकल रीसर्च www.icriindia.com
- बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी www.bcpindia.org
- जामिया हमदर्द इस्लामिया www.jmi.ac.in
- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रीसर्च, पंजाब. www.niper.nic.in

## नोकरी संदर्भातील इतर काही लिंक्स -

http://mahanews.gov.in
http://www.sarkarinaukri.blogspot.com
http://govt-jobs.blogspot.com/
http://dhule.nic.in
http://amravati.gov.in/index.htm
http://socialjustice.mah.nic.in/
http://www.maharashtra.gov.in/
http://mhada.maharashtra.gov.in/
http://oasis.mkcl.org/
http://www.crpf.nic.in/

**विनामूल्य मराठी ई-पुस्तकांचा खजिना, ३०० हून अधिक मराठी ई-पुस्तक घर बसल्या नेट वर वाचाः**
www.netbhat.com
विभिन्न प्रकारचे सॉफ्टवेअर्स उदा. Auto backup, typing tutor, personal notings, management, accounts, multimedia web internet संबंधी देश विदेशातील हजारो साफ्टवेअर इंजीनियर द्वारा निर्मित साफ्टवेअर बिनामूल्य डाउनलोड कराः **www.completelyfreesoftware.com**
**आपली जन्मकुंडली, वधू-वर गुण मिलन, मंगळ दोष, राशि भविष्य इत्यादि विनामूल्य जाणून घेण्यासाठी- www.askganesha.com**



## स्पेशल नान

**साहित्य :** २ कप मैदा, अर्धा चमचा ताजे यीस्ट, अर्धा कप दूध, १ चमचा साखर, अर्धा कप घुसळलेले दही, १ चमचा बेकिंग पावडर, २ चमचे तूप, अर्धा चमचा मीठ, अर्धा कप खवा, कलौंजी व खसखस वर पेरायला.

कृतीः यीस्ट साखर व थोडे पाणी एकत्र करावे. मैदा, मीठ, बेकिंग पावडर चाळून घ्यावे. मैद्या मध्ये दही, दूध यीस्ट घालून एकत्र भिजवावे. ४ तासा करीत हे मिश्रण ठेवावे. त्यानंतर खवा व चिमूटभर केशर घाला व त्यास घट्ट मळून घ्या. त्याचे पाच गोळे बनवा. पर्त्येक गोळ्यात थोडासा खवा भरुन नानचा आकार द्या.पाण्याचा हात लावून खसखस, कलौंजी त्यावर पेरा व नंतर ओव्हन मध्ये भाजा. झटपट स्पेशल नान खाण्यासाठी तयार.

## कश्मिरी दम आलू

**साहित्य** : अर्धा किलो लहान बटाटे जे अर्धवट उकडून सोलून टोचून तळून घ्यावे, २-३ लवंगा, दालचिनी, २-३ मसाला वेलदोडे, १ तमालपत्र, एक चमचा लाल तिखट, १ चमचा सुंठपुड, अर्धा चमचा बडीशेप पुड, अर्धा चमचा गरम मसाला, घुसळलेले दही अर्धा वाटी, हिंग पूड अर्धा चमचा व १ ग्लास पाणी, तेल व मीठ आवश्यकतेनुसार

कृतीः तल गरम करुन त्यात वरील सर्व मसाले घाला व त्यानंतर त्यात हिंग तसेच दही घाला. तिखट बडीशेप पूड, सुंठ इत्यादि घाला, तळलेले बटाटे , मीठ घाला, शेवटी गरम मसाला त्यात पेरा.

कश्मिरी दम आलू खाण्यालरिता झटपट तयार

# गाथा महान क्रिकेटविरांची

सौ. वैभवी विश्वास अभ्यंकर

## महान फलंदाज चंदू बोर्डे



चंदू बोर्डे यांनी पाचव्या दशकाच्या अखेरीस भारतीय संघात एक उदयोन्मुख दर्जेदार फलंदाज म्हणून प्रवेश केला होता. सहाव्या दशकाच्या प्रारंभी भारताचे ते आघाडीचे अष्टपैलू खेळाडू होते. सहाव्या दशकाच्या मध्यावर त्यांनी भारतीय फलंदाजीचा भार वाहिला. दशकाहून अधिक काळ चंदू बोर्डे भारतीय क्रिकेटचे आधारवड होते. 1967 मध्ये बार्बाडोसमध्ये झालेल्या राष्ट्रकुल क्रिकेट सामन्यात शेष विश्व संघातर्फे खेळलेल्या खेळाडूंमध्ये समावेश झालेले एकमेव भारतीय खेळाडू चंदू बोर्डे हे होते. चंदू बोर्डे यांचे अष्टपैलूत्व वादातीत होते. फलंदाजीच्या भात्यातला प्रत्येक फटका त्यांच्याकडे होता. विजय हजारे यांच्या शैलीवर आधारलेली चंदू बोर्डे यांची फलंदाजी पाहण्यासारखी होती. ते अधिक आक्रमक होते. त्यांची लेग स्पीन गोलंदाजीची अदाकारी अलौकिक होती. भारतीय संघाला एकहाती सामना जिंकून देण्याची क्षमता त्यांच्या गोलंदाजीत होती. 1964 साली खांद्याला झालेल्या दुखापतीमुळे त्यांच्या गोलंदाजीवर मर्यादा आली. क्षेत्ररक्षक म्हणूनही बोर्डे यांनी लौकिक निर्माण केला होता. प्रारंभीच्या काळात ते मैदानी क्षेत्ररक्षक होते. नंतर त्यांनी ती अदाकारी खेळपट्टीनजीकच्या क्षेत्ररक्षणात दाखविली. चंदू बोर्डे यांच्या कारकीर्दीचा प्रारंभ स्वप्नवत झाला. बलाढ्य वेस्ट इंडिजविरूद्ध 1958-59 च्या मालिकेत चंदू बोर्डे यांनी 109 व 96 धावा काढल्या. सलीम दुराणीसोबत 1961-62 च्या इंग्लंडविरूद्ध मालिकेतील विजयात चंदू बोर्डे यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. वेगवान गोलंदाजी खेळणारा भरवशाचा फलंदाज अशी आपली प्रतिमा त्यांनी निर्माण केली. मॅकेन्झी, हॉल, गिंफिथ, या कर्दनकाळ वेगवान गोलंदाजांविरूद्ध खेळताना त्यांनी सातत्याने धावा काढल्या. वाढत्या वयाबरोबर बोर्डे यांच्या कारकीर्दीचा आलेख उतरत गेला. युवा खेळाडूंना संधी देण्याच्या धोरणाचे पहिले बळी बोर्डे ठरले.

कारकीर्द- ५५ कसोटी, ३०६१ धावा, सर्वोच्च नाबाद १७७, ५ शतके, १८ अर्धशतके, ३७ झेल. गोलंदाजी : ४६.४८ च्या सरासरीने ५२ बळी, ८८ धावांत ५ बळी.

## महान फलंदाज दत्तू फडकर





साठाव्या (60व्या) शकातील अग्रगण्य भारतीय क्रिकेटपटूंपैकी दत्तू फडकर हे एक होते. सुमारे एक दशक दत्तू फडकर यांनी भारतीय क्रिकेटची अष्टपैलू खेळाडू म्हणून सेवा केली. फडकर हे मधल्या फळीतील एक तडाखेबाज फलंदाज होते. ते मध्यमगती गोलंदाजी करायचे. त्यांच्या गोलंदाजीत कमालीची अचूकता होती. ते चेंडू दोन्ही बाजूस स्विंग करायचे. उंचपु-या दत्तू फडकर यांची छबी आकर्षक होती. त्यामुळे त्यांची प्रथमदर्शनीच समोरच्याव्यक्तीवर छाप पडायची. 1947-48 च्या ऑस्ट्रेलिया दौ-यासाठी फडकर यांची राखीव खेळाडू म्हणून प्रथम निवड झाली होती. त्या दौ-यावरील कामगिरीच्याबळावर त्यांनी अंतिम अकरा जणांमध्ये स्थान मिळविले. त्यांची फलंदाजीची प्रगतीही थक्क करणारी होती. विशेषत: लिंडवाल आणि मिलर यांच्या गोलंदाजीचा सामना करीत असताना दाखविलेले धाडस कौतुकास्पद होते. कसोटी पदार्पणातच त्यांनी 51 व 8 धावा काढल्या व 14 धावांत 3 बळी घेतले. त्यांनी त्या मालिकेत 52.33 च्या सरासरीने कसोटीत 314 धावा केल्या होत्या. फडकर यांनी आपले पहिले कसोटी शतक झळकाविताना विजय हजारे यांच्यासोबत सहाव्या विकेटसाठी 188 धावांची भागीदारी केली. 1948-49 च्या मालिकेत विंडीजविरूद्ध मद्रास कसोटीत त्यांनी पहिल्या डावात 159 धावांत 7 बळी ही आपली

सर्वोत्तम कामगिरी नोंदविली. इंग्लंडविरूद्ध कलकत्ता येथे अष्टपैलुत्वाची झलक दाखविताना 115 धावा फटकावून त्यांनी 4 बळीही घेतले होते. मुंबई कसोटीत दोन्ही डावात त्यांनी वॉलकॉटचे उडविलेले त्रिफळे आजही स्मरणात आहेत. मात्र त्यानंतर इंग्लंडमध्ये आल्फ गोव्हरच्या प्रशिक्षण केंद्रात पाठवून आपण त्यांच्या गोलंदाजाची लय घालविली असे वाटते. त्यानंतर पूर्वीचे फडकर पाहायला मिळाले नाहीत. सुंदर क्लबकडून कांगा लीग खेळताना ते ऑफस्पिन गोलंदाजी करायचे. फडकर यांनी कसोटीत मात्र कधीही ऑफ स्पिन गोलंदाजी केली नाही याचे आश्चर्य वाटते.

कारकीर्द- ३१ कसोटी, १२२९ धावा, २ शतके, ८ अर्धशतके, १२३ धावांची सर्वोच्च खेळी गोलंदाजी : ३६.८५ च्या सरासरीने ६२ बळी, ५ पेक्षा अधिक बळी ३ वेळा.

## महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन

सर डॉन ब्रॅडमन म्हणजे क्रिकेटमधील एक आश्चर्य होते. क्रिकेटच्या क्षेत्रातील त्यांनी कळस गाठला होता. क्रिकेटशी पूर्णपणे समरस झालेल्या सर डॉन ब्रॅडमन यांनी बुद्धिकौशल्य, चिकाटी आणि एकाग्रता याच्या जोरावर क्रिकेटमधील परिपूर्णतेची सीमा गाठली. आजतागायत जगातील इतर फलंदाज 60 सरासरी धावांच्या आजूबाजूस घुटमळत असताना सर डॉन ब्रॅडमन यांची 99.94 धावांची सरासरी त्यांचे फलंदाजीच्या विश्वातील सर्वोच्च स्थान स्पष्ट करते. त्यांच्या भात्यात सर्व फटके होते. पण पूलच्या फटक्यावर त्यांची जबरदस्त हुकूमत होती. ते कव्हर्समधील उत्तम क्षेत्ररक्षक होते. वेळप्रसंगी लेग स्पीन गोलंदाजी करायचे. प्रदीर्घ चिकाटी आणि एकाग्रता अतुलनीय होती. क्रिकेट विश्वास लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या ब्रॅडमन यांची एकाकी वृत्ती मात्र अनाकलनीय होती. निवृत्तीनंतरही ते सार्वजनिक समारंभात मिसळताना फारसे दिसले नाहीत. ब्रॅडमन एकाकी, अबोल असले तरी असहिष्णू, निर्दयी किंवा तुसडे नव्हते. गुणी खेळांडूंची ते कदर करायचे. त्यांची स्तुती करायचे . आवश्यक तेथे मार्गदर्शनही करायचे. बातचीत उंची, कणखर बांधा, चेहऱ्याला उठाव देणारा केशसंभार आणि खेळल्यामुळे लाली चढलेली गौर काया यामुळे ब्रॅडमन यांची छबी गोंडस व आकर्षक वाटयची. त्यांच्या हालचालीत कायम वेग असायचा. तोच वेग त्यांच्या फलंदाजीत परावर्तित झाला असावा. क्रिकेट खेळण्याचा निखळ आनंद स्वत: लुटताना त्यांनी तेच समाधान क्रिकेट-रसिकांनाही दिले. त्यामुळे ते क्रिकेटविश्वात अजरामर झाले.



कारकीर्द : फलंदाजी- ५२ कसोटी, ८० डाव, नाबाद १० वेळा, एकूण धावा ६९९६, सर्वोच्च ३३४, सरासरी ९९.९४, शतक २९, अर्धशतके १३, झेल ३२

## सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक नरेन ताम्हाणे

भारतीय क्रिकेट संघातील यष्टिरक्षकाच्या जागेसाठीचा संगीतखुर्चीचा खेळ पाहिला की नरेन ताम्हाणेंची प्रकर्षाने आठवण येते. प्रोबीर सेन ते फारुख इंजिनीयर या दर्जेदार यष्टिरक्षकांच्या कालखंडातील नरेन ताम्हाणे हे सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक होते. यष्टींपाठी ताम्हाणे असले की गोलंदाज आणि कप्तान निश्चिंत असायचे. ते यष्टींपाठी चपळ, सावध आणि घारीची नजर असणारे यष्टिरक्षक होते. नजरेइतकीच सफाई त्यांच्या हालचालीतही होती. वेगवान गोलंदाजीवर उडालेले झेल टिपताना किंवा फिरकी गोलंदाजीवर चकलेल्या फलंदाजाला यष्टिचीत करतानाची त्यांची सफाई व चपळाई अवर्णनीय होती. ताम्हाणे सुरक्षित व विसंबून राहण्याजोगे यष्टिरक्षक



होते. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांना आंतरराष्ट्रीय संघाविरूद्ध खेळण्याची संधी मिळाली. त्या संधीचे सोने त्यांनी केले. नंतरच्या म्हणजे 1954 च्या हंगामातच त्यांची पाकिस्तानविरूद्धच्या कसोटी मालिकेसाठी निवड झाली. पदार्पणातच त्यांची यष्टींपाठी पाच बळींची नोंद केली. त्या मालिकेतील पाचही कसोटींत ताम्हाणे खेळले. त्यात त्यांनी घेतलेल्या 19 बळींचा उच्चांक आजही कायम आहे. तेव्हापासून 1961च्या पाकिस्तानविरूद्धच्या मालिकेपर्यंत त्यांना भारतीय संघात यष्टिरक्षक म्हणून पहिली पसंती दिली जायची. त्यांनंतर मात्र बुधी कुंदरन यांच्या फलंदाजीच्या क्षमतेमुळे ताम्हाणेंना यष्टिरक्षकाची जागा खाली करावी लागली. मात्र यष्टिरक्षणात बुधी कुंदरन ताम्हाणेंची उणीव भरून काढू शकले नाहीत, मात्र उत्तम यष्टिरक्षणाबरोबरच ताम्हाणेही उत्कृष्ट फलंदाजही होते. आपल्या दुस-याच कसोटीत पाकिस्तानविरूद्ध भावलपूर येथील कसोटीत त्यांनी 9व्या क्रमांकावर फलंदाजीसाठी येऊन नाबाद 54 धावा फटकाविला होत्या. यष्टिरक्षक ताम्हाणे बँकांच्या लॉकरइतके सुरक्षित होते. त्यांची यष्टिरक्षणाची कला दिखाऊ किंवा बेगडी नव्हती. कोणताही बडेजाव त्यांच्या कलेत नव्हता. आपले कार्य नित्यनियमाने करणारा तो यष्टीपाठचा कर्मयोगी होता.

कारकीर्द- २१ कसोटी, २२५ धावा, यष्टीपाठी ३५ झेल व १६ यष्टिचीतांची नोंद.

## लेगस्पिन गोलंदाज सुभाष गुप्ते

आज शेन वॉर्नचा जो दरारा विश्व क्रिकेटमध्ये आहे तीच दहशत सुभाष गुप्ते यांनी आपल्या लेगस्पिन गोलंदाजीच्या बळावर साठाव्या दशकात निर्माण केली होती. रिची बेनॉ यांच्या सारख्या प्रथितयश लेगस्पिन गोलंदाजाच्या कालखंडातही सुभाष गुप्ते यांच्या लेगस्पिन गोलंदाजीचा दर्जा जागतिक क्रिकेटमध्ये उच्च मानला गेला होता. यातच त्यांच्या गोलंदाजीची महती पटू शकेल. सर्वसाधारण भारतीय व्यक्तीप्रमाणे देहयष्टी असणा-या सुभाष गुप्ते यांनी लेगस्पिन गुगली गोलंदाजीचे मायाजाल 1951 ते 1962 या कालखंडात निर्माण केले. काचेच्या पृष्ठभागावरही गुप्ते चेंडू वळवू शकतील, अशी प्रतिमा त्यांनी त्या कालखंडात निर्माण केली होती. 1951 मध्ये इंग्लंडविरूद्ध कोलकाता कसोटीत भारतातर्फे पदार्पण करणा-या सुभाष गुप्ते यांची गोलंदाजीची कारकीर्द बहरू लागली. 1953 च्या वेस्ट इंडिज दौ-यामध्येच. त्या दौ-यात त्यांनी 50 कसोटी बळी घेतले. त्यापैकी 27 बळी तर त्यांनी फलंदाजीसाठी धार्जिण्या पाटा खेळपट्टीवर घेतले होते. सुप्रसिद्ध थ्री डब्ल्यूज् त्रिकूट, स्टॉलमेयर, रेय, यांच्यासारख्या रथी-महारथी फलंदाजांना त्यांनी नामोहरम केले होते. 1954-55 चा पाकिस्तान दौराही त्यांना फलदायी ठरला. नंतरच्या हंगामात न्यूझीलंडविरूद्ध कसोटी मालिकेत त्यांनी 34 बळी घेतले. जो उच्चांक चंद्रशेखर यांनी 27 वर्षानंतर मोडला. ऑस्ट्रेलियाच्या नील हार्वे यांनी गुप्ते यांच्या गोलंदाजीची लय 1956-57 च्या मालिकेत बिघडविली होती, पण दोन हंगामातच गुप्ते यांच्या मनगटातील जादू पुन्हा खेळपट्टीवर अवतरली. त्यांनंतर वेस्ट इंडिजमधील मुलीशी लग्न करून सुभाष गुप्ते त्रिनिदादमध्ये स्थायिक झाले.



कारकीर्द- गोलंदाजी ३६ कसोटी, २९.५५ च्या सरासरीने १४९ बळी, १०२ धावांत ९, बळी ही सर्वोत्तम कामगिरी, ५ पेक्षा अधिक बळी १२ वेळा.

## आदर्श फलंदाज विजय हजारे

विजय हजारे एक आदर्श फलंदाज होते. फलंदाजीची तंत्रशुद्धता त्यांनी भक्कम बचावाच्या पायावर उभी केली होती. या दोन गुणांना अप्रतिम एकाग्रतेची जोड लाभली होती. हजारेंच्या फलंदाजीचा भाता अक्षय होता. सर्व त-हेचे फटके त्यांच्या पोतडीत होते. त्या पोतडीतला स्क्वेअरकटचा फटका कायम स्मरणात राहण्याजोगा होता. लहान चणीचे विजय हजारे फटकेबाजीच्या वेळी कणखर दंड आणि मनगटांचा वापर करायचे. वेळेप्रसंगी अनियमित फटक्यांमध्ये एखाद्या फटक्याचे रूपांतर

करण्याची कलाही त्यांना अवगत होती. विजय हजारेंनी स्थानिक क्रिकेटमध्ये खो-यांनी धावाकाढल्या. हिंदू संघाविरूद्ध खेळताता शेष संघाच्या 387 धावसंख्येत हजारेंच्या धावाहोत्या नाबाद 309. त्यांनी 57 शतके झळकाविली होती. गुल महंमदसोबत



त्यांनी केलेली 577 धावांची भागीदारी अचंबित करणारी होती. 1946-47 च्या हंगामात बडोदा संघातर्फे होळकरांविरूद्ध खेळताना त्यांनी विक्रमी भागिदारी केली होती. विजय हजारे उत्कृष्ट मध्यमगती गोलंदाजही होते. त्यांनी 24.83 धावांच्या सरासरीने स्थानिक क्रिकेटमध्ये 595 विकेट घेतल्या होत्या. त्यांनी प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये 18,754 धावा फटकाविल्या होत्या. ते अप्रतिम क्षेत्ररक्षक होते. ते शांत, मितभाषी व भावनांचे प्रदर्शन टाळणारे कर्णधार होते.

कारकीर्द- ३० कसोटी, ५२ डाव, ४७.६५ सरासरी , एकूण धाव, २१९२, ७ शतक, ९ अर्धशतके. गोलंदाजी : सरासरी ६१ धावा देऊन २० बळी, २९ धावांत ४ बळी ही सर्वोत्तम कामगिरी.

## महान फलंदाज विजय मर्चंट



विजय मर्चंट भारतीय फलंदाजीचे आदर्श होते. प्रत्येक चेंडू त्याच्या गुणवत्तेनुसार खेळायचा हेच त्यांचे ध्येय होते. त्यांना सहा खराब चेंडू टाका. ते सहाही चेंडू सीमापार पाठवतील. त्यांना सहा चांगले चेंडू टाका. ते सहाही चेंडू तंत्रशुद्ध पद्धतीने अडवतील, असे जॉन आर्लट यांनी मर्चंट यांच्या फलंदाजीच्या शैलीचे वर्णन करताना लिहिले होते. मर्चंट यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीला अचूक अंदाज घेण्याच्या अचाट क्षमतेची जोड लाभली होती. त्यांची प्रथम दर्जाच्या क्रिकेटमधील 72 धावांची सरासरी त्याचेच प्रतीक आहे. सर डॉन ब्रॅडमन यांच्या सातत्याच्या जवळ जाणा-या मर्चंट यांची रणजी क्रिकेटमधील सरासरी 98.35 होती. 1933-34 च्या हंगामात इंग्लंडविरूद्ध पहिल्या कसोटी मालिकेत सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मर्चंट यांना सहा डावांत एकदाच अर्धशतकी मजल मारता आली. मात्र त्यांनंतर त्यांनी सलामीला खेळणे पसंत केले. 1936 साली ओल्ड ट्रॅफर्ड कसोटीत शतक झळकावून मर्चंट यांनी आपले फलंदाजीचे स्थान निश्चित केले. क्रिकेटच्या पुस्तकातील सर्व फटके भात्यात असलेले विजय मर्चंट त्यांच्या लेट कट मुळे सर्वपरिचित होते. ते तो फटका एवढा उशिरा खेळायचे की कधी कधी वाटायचे, यष्टिरक्षकाच्या ग्लोव्हज्मधूनच चेंडू काढून त्यांनी सीमापार पाठवला आहे. 1946 च्या इंग्लिश दौऱ्यात ओल्या खेळपट्ट्यांवर त्यांच्या धावसंख्येची सरासरी 74.53 इतकी होती.

कारकीर्द- १० कसोटी, १८ डाव, ४७.७२ च्यासरासरीने ८५९ धावा, सर्वोच्च धावसंख्या १५४, ३ शतक, ३ अर्धशतके.

■■■■■

# व्यायामाचा प्रकार व दहा मिनिटात खर्च होणाऱ्या कॅलरीज विषयी माहिती

सौ. स्नेहलता अभ्यंकर

| व्यायामाचा प्रकार | खर्च होणाऱ्या कॅलरीज |
|---|---|
| एरोबिक्स | १३४ |
| बागकाम | ५७ |
| धावणे | १५३ |
| वाचणे/टीव्ही पाहणे | १४ |
| झोपणे | १४ |
| उभं राहणे | २८ |
| व्हॉलीबॉल खेळणे | ४० |
| जिना चढणे | २०२ |
| सायकल चालवणे (१५ कि.मी. वेगाने | ७४ |
| नृत्य करणे(हाय इम्पॅक्ट) | १२४ |
| फुटबॉल खेळणे | १०२ |
| दोरीच्या उड्या | ११६ |
| पोहणे | १३० |
| टेनिस | ८१ |
| वेट ट्रेनिंग | १३७ |

साभार-लोकप्रभा




## फळांमधल्या कॅलरीज

| | |
|---|---|
| सफरचंद | ८० |
| सफरचंदाचा रस(एक कप) | ११५ |
| केळ | १०५ |
| खजूर (१०) | २३० |
| हापूस आंबा | १५० |
| संत्र | ७० |
| पपई (१०० ग्रॅम) | ४५ |
| अननस(२२५ ग्रॅम) | ६० |
| कलिंगड (अर्ध) | १५५ |

भाज्यांमधल्या कॅलरीज

| | |
|---|---|
| बीट(१०० ग्राम) | ३५ |
| कोबी(छोटा) | २५ |
| गाजर | ३० |
| फ्लॉवर | ३० |
| काकडी | १५ |
| फरसबी(१०० ग्राम) | ४० |
| मशरुम(अर्धा कप) | ०९ |
| कांदा(१०० ग्राम) | ४० |
| वाटाणा(१ कप) | १२५ |
| बटाटा (उकडलेला) | १२५ |
| भोपळा(१ कप) | ५० |
| कोथिंबीर (१ कप) | १० |
| टोमॅटो | २० |

■■■■■

# भगवद्गीतेतील व्यवस्थापनशास्त्र



डॉ. सौ. संपदा अभ्यंकर

**आ**जचे जग हे स्पर्धात्मक आहे. आजची तरुणाई यश मिळविण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहे पण फार थोड्यांना याची जाणीव असते की यशामध्ये व्यक्तिमत्वाचा फार मोठा वाटा असतो. कदाचित योग्य मार्गदर्शनाच्या अभावी आजची तरुणाई भरकटत तर चालली नाही ना ? विज्ञानवादी म्हणताना केवळ चंगळवादाची कास धरते आहे का असे प्रश्न उभे राहतात. कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती, आंतरिक उर्मी, कठोर परिश्रम आणि ध्यानधारणा, मनाचे संतुलन हे अनिवार्य आहे. मानसिक संतुलन अत्यंत महत्वाचे ! खरेतर भगवद्गीतेची सुरवातच मुळी अर्जुनाची कुरुक्षेत्रावर जी मनस्थिती झाली होती तिथून होते. पहिल्याच अध्यायात



दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति

श्लोकापासून पुढे अर्जुनाने रणांगणावर आपले सर्व नातेवाईक पाहिले आणि जीवितहानीच्या भयामुळे त्याचे मन चक्रावून गेले. धैर्य नाहीसे झाले. जेव्हा व्यक्तींवर भौतिक परिस्थितीचा अत्यंत प्रभाव असतो अशावेळी ती व्यक्ती भयभीत झालेली आणि मानसिक संतुलन ढळण्याच्या अवस्थेत असलेली आढळते. जेव्हा आपल्या अपेक्षांना फळच येणार नसेल तर मग ह्यांचा विनाकारण भाव काय? कारण प्रत्येकाला स्वत:मध्ये आणि स्वत:च्या कल्याणामध्येच आस्था असते. सर्वसामान्य माणसाप्रमाणे भौतिक दु:खात बद्ध झालेल्या अर्जुनासमोर मार्गदर्शक, सखा हल्लीच्या भाषेत मेंटॉर म्हणून उभे राहतात. दुर्बलतेमुळे कर्तव्याबद्दल गोंधळून गेलेला, मन:शांती नष्ट झालेला अर्जुन भगवंताना शरण जात या कोंडीतून सोडविण्यासाठी उपदेश करण्याची मागणी करीत आहे. (2-7) आपले कर्तव्य पालन करण्यासाठी समुपदेशकाच्या भूमिकेतून (भगवान श्रीकृष्ण) त्यांच्याशी संवाद साधतो. हा संवाद म्हणजे स्वव्यस्थापन आणि अनुषंगाने येणारे विविध व्यवस्थापन याचेच वर्णन आहे.

आजच्या आधुनिक संगणकीय युगात व्यवस्थापन हा परवलीचा शब्द झालेला आहे. मग ते कौटुंबिक असो, कारखाने, पतपेढ्या, सरकार किंवा काही सामाईक हेतूने एकत्र आलेल्या संस्थासाठी असो. हल्लीच्या तरुणांना केवळ एखाद्या शाखेचे पदवीधर असून चालत नाही तर टाइम, फायनान्स, एच.आर.इव्हेंट, पर्सोनेल, मटेरियल, मशीनरी, प्लानिंग इ. अनेक विषयांपैकी व्यवस्थापन शास्त्रावली पदवी किंवा पदविका उपजिवीकेचे साधन मिळविण्यासाठी आवश्यक झाली आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर, व्यवस्थापन म्हणजे मानवीय श्रमातून निर्माण होणा-या सामूहिक व्यवहाराप्रत प्रत्येकजण आपापले कर्तव्य कसे पार पाडतो आणि त्या घटनेची पूर्ती होण्यासाठी प्रत्येकाचे स्वत:शी आणि इतरांशी वर्तन कसे असते याचे वर्णन, विचार, प्रक्रिया, प्रतिक्रिया, नियोजन, उत्पादन, ध्येय या सगळ्याचे एकत्रीकरण म्हणजेच व्यवस्थापन असे म्हणावयास हरकत नाही. ह्या सगळयामध्ये मनुष्यबलाचे व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे,

त्याचे चालणरे मनोव्यापार ब-याचदा त्याला स्वत:लाही अनाकलनीय असतात. जो संघनेचा प्रमुख किंवा सिस्टीमस्ना पुढे नेणारा असतो त्याच्यावरच प्रमुख्याने संघटनेचा यशस्वीपण अवलंबून असते. त्यासाठी स्वत:च्या क्षमतांची आणि कमतरतांचीही पूर्णपणे जाणीव असणे महत्वाचे.

मनोमालिन्यावर मात

स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास करताना प्रथमत: व्यक्तीने मनाचा दुबळेपणा झटकून टाकला पाहिजे. मला हे जमेल का ? मी हे करु शकेन का ? मला हे शोभले का ? अशा प्रकारचे विचार म्हणजे वास्तविकपणे मनोदौर्बल्यच आहे (गीता 2-3) तेव्हा असे विचार झटकून टाकून सक्षमतेने कार्यास सिद्ध व्हावयास हवे. व्यवस्थापकाचे मन हे संस्थेला कार्यप्रवरणता आणि वैधानिक दृष्टी असावयास हवे. मानवी मन हे अत्यंत चंचल उच्छंखृल दुराग्रही आणि अत्यंत बलवान असून मनावर नियंत्रण ठेवणे हे वा-याला नियंत्रित करण्यापेक्षाही अवघड आहे. ह्या व्यवहारी जगात अनेक प्रकारच्या विरोधकांना सामोरे जावे लागते. मग ते बाह्य विरोधक असोत की आंतरिक. त्यांचा सामना करण्यासाठी चंचल मनाला नित्याचा सराव आणि अनासक्तीद्वारे संयमित करणे शक्य आहे. (गीता 6,34,35)

अस्थिर आणि दुबळ्या मनाकडून सहज चुका होऊ शकतात. एखादा अडथळा निर्माण झाला तर त्या अडथळ्यावर मात करता यायला हवी. मला नेमके काय हवे आहे ? मला नेमके काय करावयाचे आहे ? माझे कर्तव्य कोणते आणि मी ते कशा रितीने पार पाडणार आहे ? ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी स्वत:चे मन स्वत:चा मित्र असावयास हवे. जर मनावरचा ताबा सुटला तर मनासारखा दुसरा शत्रू नाही (गीता 6-6) मन चिंती ते वैरी न चिंती, गीतेवरील मुखपृष्ठ रथात बसलेला अर्जुन, त्याचे सारथ्य करणारे श्रीकृष्ण, त्यांच्या हातात असलेला लगाम आणि रथाला जोडलेले 5 घोडे अतिशय प्रतिकात्मक आहेत. हे घोडे म्हणजे जणू 5 ज्ञानेंद्रिये त्वचा, नाक, कान, डोळे, जीभ! विवेकबुद्धी सारासार विचार म्हणजे श्रीकृष्ण आणि रथात बसलेला अर्जुन म्हणजे व्यक्तचे मन ! अवघ्या जीवनाचे सार या प्रतिकात्मक चित्रात आहे. व्यक्ती म्हणून स्वत:ला घडवताना मिळविलेल्या ज्ञानाचा योग्य उपभोग करुन घेत विवेकबुद्धीने कर्म करीत या मी ला संसाराच्या पलीकडच्या तीरावर नेणे म्हणजेच जीवनाचे व्यवस्थापन.

हे व्यवस्थापन करताना सामान्य माणसाला अनेक कर्तव्यांना सामोरे जावे लागते अनेक नातेसंबंध मग ते औपचारिक असोत वा अनौपचारिक, रक्ताचे की मैत्रीचे, ह्या संबंधांची जपणूक करतानां जी अनेक कर्मे करावी लागतात ती आसक्ती न ठेवता करायला हवीत (गीता 3.19) आसक्ती, अपेक्षा ह्यातून मला काय मिळणार ? माझा फायदा काय ? असे प्रश्न उभे राहिले की जे अपेक्षित आहे ते न मिळाल्याने सुटणारा संयम, येणारा राग होणारी चिडचिड आणि त्यातून येणारा ताण हे सगळे अपरिहार्य आहे. अनेक वैद्यकीय संस्थांचे अहवाल असे सांगतात की 21 वे शतक हे शारीरिक व्याधी इतकेच मनोव्याधींचे असणार आहे. अगदी साधे उदाहरण द्यायचे तर आज शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांची होणारी ससेहोलपट, महाविद्यालयांच्या प्रवेश प्रकियेस लागणारा कस,जीवघेणी स्पर्धा, त्यातच पालकांच्या अपेक्षांचे वाढणारे ओझे. जे आपण मिळवू शकलो नाही, करु शकलो नाही त्याची अपेक्षा मुलांकडून करायची त्यासाठी धडपडायचे. मग प्रत्येक कुटुंबात घडून येणारा नियमित संवाद, आम्ही तुमच्यासाठी एवढे करतो आणि तुमच्याकडून आम्ही फक्त चांगला अभ्यास करावा, चांगले गुण मिळवावेत अशी अपेक्षा ठेवली तर आमचे काय चुकले ह्या अपेक्षांचं मुलांवर इतक दडपण येते की जर आपण ह्या अपेक्षा पु-या करत शकलो नाही तर ? लढायच्या आधीच रणांगण सोडून पळून जायचे (विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांचे प्रमाण हे कशाचे द्योतक आहे ?) निराश व्हायचे आणि कर्तव्यच्युत व्हायचे. नियत कर्म करणे हे कर्म न करण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. कर्म केल्यावाचून आपल्या शरीराच निर्वाहही मुनष्य करु शकत नाही. (गीता 3.8) ही जाणीव करुन द्यायला एका मार्गदर्शकाची 'मेंटॉरची' नितांत गरज असते. खरेतर मेंटॉर या शब्दाचा मराठीत प्रतिशब्द बघायचा तर सन्मित्र, समुपदेशक, मार्गदर्शक, सल्लागार असे अनेक शब्द मिळू शकतील. मेंटॉर हे शब्द त्या सगळ्या छटांचा एकत्रित अविष्कार आहेच. पण त्याहीपलिकडे जाऊन हे एक भिन्न व्यक्तीमधले अतिशय वेगळ्या स्तरावर जाणारे नाते आहे. ह्याचा माग घेत गेले तर होमरच्या ओडिसी पर्यंत जायला हवे. विजनवासात राजा ओडिससने देवी ॲथेनाला मेंटॉर मानले सॉक्रेटिस, प्लेटो किंवा फ्रॉईड आणि जु ही आणखी नावे, आपल्याकडे तर ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे गीता. श्रीकृष्ण अर्जुनाचा हा संवाद म्हणजे केवळ अर्जुनाचे व्यक्तिमत्व घडविणे किंवा त्याच्या शंकेने उत्तरे देणे इतकेच मर्यादित नाही. तितक्याच सक्षमतेने तो मेंटॉरिंग करताना दिसतो.

आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीत तर अशा मेंटॉरची उणीव तीव्रतने भासते. एकत्र कुटुंबपद्धती असताना घरातील

आजी, आजोबा, आत्या, मावशी, काका, मामा इ. या सारख्या नात्यांमध्ये ही ताकत असायची किंवा अशी एखादी व्यक्तीतरी या भूमीकेत पारंगत असायची अर्थात या टप्यापर्यन्त पोहोचण्यासाठी दोघांचीही ताकद तेवढीच असावी लागते. भावनिक बौद्धिक पातळी जुळून येणे महत्त्वाचे. मेन्टीला अचूक क्षणी मार्गदर्शन करून त्याच्या मनाचे भांबावलेपण संपवण्यास मेंटॉर मदत करतो. हा भावबंध दोघांनाही अधिक परिपूर्ण करतोच पण मेंटीचे जीवन अधिकाधिक गुणात्मक सकारात्मक होत जाते. हे गुणात्मक बदल घडविताना आत्मविश्वास महत्त्वाचा! तसेच मेंटॉर जसे convience करतो तेही अत्यंत आवश्यक. जे आपल्याला पटते ते दुस-यालाही पटवता यायला हवे. ही convincing power तुमचे आयुष्यच बदलून टाकते. एखादी गोष्ट आपल्या conscious ला पटली की मग आपल्या जगण्याच्या पद्धतीतही सिनेमासारखे 3 डीज् असायला हवेत.

Determination, Devotion, Dedication. आपले कर्म काय आहे हे नक्की ठरले की त्या विषयी आत्मीयता हवी, हातात घेतलेल्या कामाविषयी निष्ठा ठेवून पुरे करण्याची जिद्द हवी. तरच ते काम सफल होऊ शकते. आजच्या तरूणाईला करीअरची निवड करताना हे निकष खूप महत्त्वाचे ठरू शकतात. आपल्या सगळ्यांचा हेतू वैध मार्गाने अर्थाजन करीत शांत आणि संयत, आनंदी जीवन जगणे हाच असतो. तेव्हा स्वत:ची आवड, त्यातून निवडलेली करीअर आणि त्याच करीअरमधून पुरेसे अर्थाजन ही त्रिसूत्री सगळ्यांनाच जमेल अस नाही. त्यातील एखादा दुवा जरी कच्चा ठरला तरी नैराश्य येऊ शकते. (गेल्या दोन वर्षात जागतिक मंदीच्या काळात ह्याचे प्रमाण तुलनेने वाढलेले दिसते.) पण त्यासाठी मन खंबीर हवे. मानसिक स्वास्थ्य, आत्मविश्वास, प्रत्येक बाबतीत स्वत:ला सिद्ध करणे, बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात् करताना स्वत:ला विकसित करणे. ह्या सगळ्या मनोव्यापारात मनाच्या विविध पातळ्यांच्या सीमारेषा इतक्या धूसर असतात की लंबकाचा कोन थोडा जरी बदलला तरी सगळेच गणित चुकू शकते. इथे आजच्या आधुनिक काळातील मेंटॉर - मनोविश्लेषक आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. गीतेच्या 13 व्या अध्यायात 8 ते 12 व्या श्लोकात याचे सविस्तर वर्णन आहे. व्यक्तीने कोणते गुण आत्मसात केले असता व्यक्तिमत्व विकसित होते, आत्मसाक्षात्काराचा स्वीकार आणि परमसत्याचा तत्त्वज्ञानात्मक शोध म्हणजे ज्ञान, बाकी सारे अज्ञान. आपले शरीर हे क्षेत्र आणि या क्षेत्राचा स्वामी तो परमात्मा तो क्षेत्रज्ञ ज्यामुळे हे ज्ञान प्राप्त होते. या ज्ञानमार्गाच्या साधनांमध्ये अमानित्व म्हणजे लोकांकडून मान प्राप्त करण्यास उत्सुक असू नये. अहिंसा - म्हणजे इतरांना दु:खात न टाकणे. क्षान्ति - म्हणजे इतरांकडून होणारा अपमान सहन करणे. आर्जवम् - मनुष्याने इतके साधे असावे की शत्रूला सुद्धा स्पष्टपणे सत्य काय ते सांगू शकेल. आचार्योपासनम् - गुरुचा स्वीकार केल्यावर गुरुला विनम्रतेने शरण जावे. बाह्यात्कारी आणि आंतरिक शुचिताही महत्त्वाची आहे. आपल्या जीवनात प्रगती करण्यासाठी दृढनिश्चयी असणे गरजेचे आहे.

आपल्या कुटुंबाविषयी प्रेमभावना असणे अजिबात गैर नाही पण त्यात अडकून न राहता आत्मविकासात त्याचा अडसर नको. सुख आणि दु:ख ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आणि हे सगळे समजून घेतल्यावर एकांतात होणारा आत्माविष्कार परम सत्यापर्यंत जाण्याचा सोपान आहे.

अर्थातच हे ज्ञान विनम्रतेने ग्रहण केले पाहिले.

हे सगळे जाणून घेतल्यावर निरपेक्ष वृत्तीने जीवन जगताना मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. अर्थातच ह्या पायरीपर्यंत पोचण्यासाठी भौतिक जगातले टक्केटोणपे सहन करावेच लागतात. ते सहन करण्याची ताकद मनोविकासाद्वारे येऊ शकते. सुरुवातीला म्हंटल्याप्रमाणे हा मनोविकास प्रत्येकाला स्वत:लाच जमतो असे नाही तर त्यासाठी मार्गदर्शकाची गरज असते. समोरच्याचे व्यक्तिमत्व फुलविण्यासाठी तो बयावत असलेल्या भूमिकांवर नजर टाकली तर श्रीकृष्ण अर्जुनाच्यानात्याचे पडदे तो आपोआप उलगडतील.

■■■■■

## आवाहन

**ई**-अभ्यंगच्या गुढी पाडवा विशेषांका बद्दल आपली प्रतिक्रिया आम्हाला खालील पत्यावर किंवा ई-मेल द्वारे अवश्य कळवा. तसेच पुढील ई-अभ्यंग विशेषांकासाठी आपले लेख/कथा/कविता, हास्य विनोद, तसेच चारोळ्या इत्यादि साहित्य आम्हाला अवश्य पाठवा. कृपया लिखाणासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो ई-मेल किंवा टपालाद्वारे संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी/भ्रमणध्वनी ई-मेल आयडी सह अवश्य पाठवावा.

**श्री संजय प्रभाकर अभ्यंकर,**
३४, गोलकुंडा, बी ए आर सी कॉलोनी,
अणुशक्ति नगर, मुंबई-४०० ०९४

# अभ्यंकर परिवाराची वार्षिक सर्वसाधरण सभा व स्नेहसंम्मेलन



दिनांक 20-21 नोव्हेंबर 2010 रोजी अभ्यंकर परिवाराचे सर्वसाधरण सभा व वार्षिक स्नेहसंम्मेलन डहाणू येथील श्री गजानन महाराज भक्त निवास येथे मोठ्या उत्साहात पार पडले. अभ्यंकर परिवाराने ठरविल्याप्रमाणे दिनांक 20 नोव्हेंबर 2010 रोजी कल्याण ते दादर दरम्यान राहणा-या अभ्यंकर कुलबंधू,भगिनी,माहेरवाशिणींसाठी ठाणे पूर्व येथून एक 22 सीटर मिनी बसची व्यवस्था केली होती. तसेच पश्चिम उपनगरांतील अभ्यंकर कुल बंधू-भगिनी-माहेरवाशिणींसाठी वसई-विरार-नालासोपारा येथील अभ्यंकर मंडळींनी एक 22 सीटर मिनी बसची व्यवस्था केली होती. सर्व मंडळी ठरवलेल्या वेळेवर आल्याने दोन्ही ठिकाणांहून बसेस सकाळी 8 वाजता डहाणू येथील परिवाराच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनास निघाल्या. बरेच दिवसानंतर सर्व अभ्यंकर मंडळी एकत्र आल्याने सर्वच अगदी आनंदित होते. बस मध्ये मागच्या संम्मेलनांची आठवण, अनुभव व गाण्यांच्या भेंड्या सुरु होत्या. प्रत्येकाच्या चेह-यावर एक वेगळाच आनंद होता.

ठरल्याप्रमाणे दोन्ही बसेस दुपारी 12 च्या सुमारास डहाणू येथील स्वयंभू महालक्ष्मी मंदिर येथे पोहचल्या. सर्वांनी देवीचे दर्शन घेतले व तेथे थोड्यावेळ आराम करून दोन्ही बसेस डहाणू येथील संतोषी माता मंदिर येथे जाण्यास निघाल्या. त्या नंतर देवी संतोषी मातेचे दर्शन घेऊन श्री गजानन महाराज मंदिर येथे आयोजित स्नेह संम्मेलन स्थळी प्रस्थान करण्यांत आले. दुपारी 1 वाजता सर्व अभ्यंकर मंडळी संम्मेलन स्थळी पोहचले.

डहाणू येथील राहणा-या सर्व अभ्यंकर कुटुंबियांनी कार्यक्रमाची संपूर्ण आखणी सुनियोजित पध्दतिने केली असल्याने व सर्व अभ्यंकरांनी त्यास सहकार्य केल्याने प्रत्येक कार्यक्रम वेळेनुसार पार पडत होता. या करिता अभ्यंकर परिवाराचे सचिव श्री विवेक अभ्यंकर व श्री विजय भास्कर अभ्यंकर,विरार यांनी मागील 3 महिन्यांपासून डहाणू येथे राहणा-या सर्वश्री प्रकाश अभ्यंकर व अनिल अभ्यंकर तसेच विद्यानंद अभ्यंकर यांच्याशी सतत संपर्क साधून संम्मेलनाविषयी दर रविवारी डहाणू येथे प्रत्यक्ष भेटून कार्यक्रमाची नियोजनबद्ध आखणी केली. त्यामुळे संम्मेलन अगदी निर्विघ्नपणे पार पडले.

संम्मेलन दोन दिवस असल्याने डहाणू येथे सर्वांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. महिलां करिता स्वतंत्र खोल्या होत्या व पुरुषांकरिता हॉल मध्ये राहण्याची व झोपण्याची व्यवस्था केली होती. सर्व मंडळी फ्रेश होऊन जेवणास बसली व त्यानंतर दुपारी 3 वाजता डहाणू येथील 'सावे नर्सरी' व आश्रम शाळेस भेटी देऊन सायंकाळी

ठिक 7 वाजता डहाणू येथील श्री घनंजय अभ्यंकर यांच्या घरी पोहचलो. दिनांक 20 रोजी कार्तिक शुध्द पोर्णिमा असल्याने त्याच्या घरी अभ्यंकर कार्यकारणीने तुळशीचे लग्न करण्याचे ठरविले होते. त्या प्रमाणे एक सुंदर व विलोभनीय तुळशी वृंदावन श्री घनंजय अभ्यंकर यांच्या घरी सजवून ठेवले होते. वृंदावनापुढे सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या. तुळशी वृंदावनाभोवती दिव्यांची सुंदर आरास केली होती व सुवासिक उदबत्ती लावली असल्याने तेथील वातावरण सुगंधित व प्रसन्न झाले होते. सर्वांचे चहापान झाल्यावर अभ्यंकर वाड्यात पारंपारिक पद्धतीने तुलसी विवाहाला आरंभ झाला. श्री व सौ घनंजय अभ्यंकर पारंपारिक वेशभूषा परिधान करुन विवाह सोहळ्यास आरंभ झाला. विधिवत सर्व पूजा गुरुजी त्यांच्या कडून करवून घेत होते. सर्व एकाग्रचित्ताने त्याचे श्रवण करीत होते. सर्व सोहळा विधिवत् पार पडला व नंतर मंगलाष्टके म्हणून सर्व अभ्यंकर मंडळीच्या साक्षीने राधा-कृष्ण तुळशी विवाह मोठ्या उत्साहात पार पडला. फटाक्यांच्या आतिशबाजीने व दीपोत्सव या मुळे अभ्यंकर वाडा अगदी उजळून निघाला होता. नंतर पेढे व चहा/कॉफी घेऊन सर्व अभ्यंकर मंडळी परत संम्मेलन स्थळी येऊन पोहचली.

सर्वांनी मनसोक्त जेवण केले व दिवस कसा गेला कळलेच नाही. त्या नंतर रात्री डहाणू येथील अभ्यंकर बालकलाकारांनी सुंदर-सुंदर गाणी सादर करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. यामध्ये कुमारी जान्हवी अनिल चि. रंजन विद्यानंद, अथर्व अनिल यांनी भाग घेतला. बालकलाकारांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी व त्यांना साथ देण्यासाठी सौ पल्लवी विलास यांनी तबला वाजवून तर सौ चावडा ताई यांनी हार्मोनियम वर साथ-सगत केली. त्यानंतर श्री नचिकेत अभ्यंकर यांनी डॉ. सलील कुलकर्णी यांनी स्वरबद्ध केलेली अनेक गाणी सादर केली. त्यानंतर सौ. प्रज्ञा संजय अभ्यंकर, श्री विजय कार्लेकर, श्री प्रमोद अभ्यंकर, सौ स्मिता अभ्यंकर सौ अंजली अभ्यंकर, कु. स्वरांगी संजय अभ्यंकर यांनी सुश्राव्य गाणी व भजने सादर केली. यावेळी श्रीमती सुलभा अभ्यंकर यांनी लोकल ट्रेन मध्ये अनुभवलेल्या विविध छटा नक्कल रुपाने हुबेहुब सादर करुन उपस्थितांची दाद मिळवली तसेच सर्व अभ्यंकर रसीकांनी सर्वांचे भरभरुन कौतुक केले.

रात्रौ 11 वा. सर्वांना मसाला दूध देण्यात आले व तदनंतर रात्रौ 12 वा. कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. श्री गजानन मंदिर भक्त निवासाच्या समोरच अथांग समुद्र असल्याने काही रसिक अभ्यंकरांनी कार्यक्रम संपल्यानंतर रात्रौ 1 वाजता समुद्र किना-यावर फेरफटका मारण्यासाठी प्रस्थान केले. तेथे गाण्याच्या भेंड्या खेळून सर्वांनी पोर्णिमेच्या चंद्राच्या प्रकाशात सागर किनारी मालवण येथील संमेलनाच्या आठवणी जाग्या करीत व पुढील संम्मेलनाच्या वेळी असेच एकत्र येऊन संम्मेलन सार्थक करावे हा मनाशी निश्चय करुन संम्मेलन स्थळी प्रयाण केले.

दिनांक 21 नोव्हेंबर रोजी संम्मेलनाचा हॉल विविध प्रकारे सजविण्यात आला होता. वेबसाईट प्रेसेन्टेशन व ई-अंक बद्दल माहिती देण्यासाठी प्रोजेक्टरची व्यवस्था करण्यांत आली होती. सकाळी चहा व नाश्ता घेऊन सर्वांनी हॉल मध्ये प्रवेश केला. प्रवेश करताच प्रत्येक सभासदांची नोंद वही मध्ये करण्यात येत होती. तसेच अभ्यंकर परिवाराचे सन् 2009-10 या वर्षाचे ताळेबंद व अहवाल सर्वांसाठी प्रदर्शित करण्यात आला होता.

परिवाराच्या कार्यक्रम पत्रिके मध्ये नमूद केल्या प्रमाणे सकाळी 10 वा. संमेलनाला सुरुवात झाली. डहाणू येथील जेष्ठ नागरिक श्री वसंत अभ्यंकर यांच्या करकमलाने दीप प्रज्वलन व गणेश वंदन करुन तदनंतर कुलस्वामीनी योगेश्वरी व व्याडेश्वर यांच्या तसबिरींना पुष्पहार घालण्यात आले. सर्वानी दोन मिनिटें उभे राहून परिवारातील सर्व मृत व्यक्तिना श्रध्दांजली अर्पण केली. त्या नंतर अभ्यंकर परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर यांनी संम्मेलनाध्यक्षांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व त्यांची सर्वांना ओळख करुन दिली.

श्री वसंत अभ्यंकर, डहाणू यांच्या शुभ हस्ते खालील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच काही गुणवंत कलाकार व्यक्तिंना परिवारा तर्फे रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले त्यांची नावे खाली प्रमाणेः

कु. मानसी निशिकांत अभ्यंकर- एम.एस्सी परिक्षा प्रथम वर्गात उत्तिर्ण

कु. मानसी विजय अभ्यंकर- बी.एस्सी परिक्षा प्रथम वर्गात उत्तिर्ण

त्याच प्रमाणे उत्तम गीत व तबला वादन सादर केल्या बद्दल कु. जान्हवी अनिल, चि. रंजन विद्यानंद, चि. अथर्व अनिल यांचा तर सौ पल्लवी विलास व सौ. चावडा ताई यांचा रोख रक्कन देवून सत्कार करण्यात आला. त्याच प्रमाणे श्री नचिकेत अभ्यंकर, सौ. प्रज्ञा संजय अभ्यंकर, श्री विजय कार्लेकर, श्री प्रमोद अभ्यंकर,सौ स्मिता अभ्यंकर, सौ अंजली अभ्यंकर, कु. स्वरांगी संजय अभ्यंकर यांनी सुश्राव्य गाणी व भजने सादर केल्या बद्दल त्यांचापण सत्कार सम्मेलनाध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला. श्रीमती सुलभा अभ्यंकर यांनी लोकल

ट्रेन मध्ये अनुभवलेल्या विविध छटा, नक्कल रुपाने हुबेहुब सादर केल्या याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्याच प्रमाणे श्री सचिन अभ्यंकर,पुणे विभाग यांचा सत्कार करण्यात आला.

अभ्यंकर परिवाराचे सचिव श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर यांनी मालवण येथे सम्पन्न झालेल्या 18 व्या वार्षिक संमेलनाचे अहवाल वाचन केले व परिवाराच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. अभ्यंकर परिवाराची वेबसाईट www.abhyankarparivar.com यावर कोण-कोणती माहिती उपलब्ध आहे याची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली तसेच परिवाराने प्रकाशित केलेल्या गुढीपाडवा व दिवाळी पाडवा विशेषंका बद्दलची विस्तृत माहिती पावर पॉइंट प्रेझंटेशन द्वारे प्रदर्शित करण्यांत आली. सर्वांनी कार्यकारणाचे कौतुक केले.

तदनंतर अभ्यंकर परिवार पुणे शाखेचे अध्यक्ष श्री हेमंत अभ्यंकर यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना परिवाराच्या कार्याचा गौरव केला व काही चांगल्या सुचना केल्या. पुढील ई-अभ्यंग मधील लेख सादर करणा-या व्यक्तिचे ई-मेल आयडी किंवा भ्रमणध्वनी लेखाच्या ठिकाणी प्रदर्शित करावा. तसेच अभ्यंकर परिवाराच्या गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी एखादी ट्रस्टची स्थापना करावी या करिता मी मदत करायला तयार आहे असे ते म्हणाले. या वेळी त्यांनी अभ्यंकरांचा ट्रस्ट तयार करत असल्यास एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. सर्व उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले व या विषयावर पुढिल मासिक बैठकित विचार करुन सर्वानुमते निर्णय घेऊन पुढिल वार्षिक स्नेह संमेलनता त्या विषयीची घोषणा करण्यांत येईल असे सचिव श्री विवेक अभ्यंकर यांनी सभेस सांगितले.

■■■■■

## पुढील 3 वर्षासाठी नविन कार्यकारिणीची निवड झाली जी खालिल प्रमाणे

### कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : श्री संजय प्रभाकर अभ्यंकर |
| उपाध्यक्ष | : सौ. अरुंधती जयंत नगरकर |
| सल्लागार | : डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर |
| सचिव | : श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर |
| खजीनदार | : श्री अशोक विद्याधर अभ्यंकर |
| कमिटी सदस्य | : श्री लिलाधर शंकर अभ्यंकर |
| | श्री निशिकांत शंकर अभ्यम्कर |
| | सौ प्रज्ञा संजय अभ्यंकर |
| | श्री विजय भास्कर अभ्यंकर |
| | श्री सचिन दिनकर अभ्यंकर |
| | श्री विजय वामन अभ्यंकर |
| | श्री दिलिप गणेश अभ्यंकर |
| | श्री विनय सुधाकर अभ्यंकर |
| | सौ आरती संजय कार्लेकर |
| | श्री शशिकांत दत्तात्रय अभ्यंकर |
| | श्री चंद्रशेखर गजानन अभ्यंकर |
| | श्री शशांक विष्णू अभ्यंकर |
| | श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर |


## हिल रिसोर्टस

| | |
|---|---|
| रेनबो रिट्रीट, लोणावळा- | ०२११४-२७३४४५ |
| वेल्वेट कण्ट्री खंडाळा- | ०२११४-२७९३०९ |
| बाईक रिट्रीट, माथेरान- | ०२१४८-२३०३६५ |
| एम टी डी सी रिसॉर्ट माथेरान- | ०२१४८-२३०२७७ |
| रग्बी रिसोर्ट,माथेरान- | ०२१४८२३०२९१ |
| एस्कॉट रिसोर्ट, माथेरान- | ०२१४८-२३०२६० |
| स्ट्रॉबेरी कण्ट्री, महाबळेश्वर- | ०२१६८-२७२१०१ |

## सी रिसोर्टस

| | |
|---|---|
| बिग स्प्लॅश अलिबाग | ०२१४१-२२६८०३ |
| सी व्ह्यू अलिबाग | ०२१४१-२२२६०५ |
| रवि किरण अलिबाग | ०२१४१-२२२४५९ |
| गोल्ड न स्वान रिसॉर्ट मुरुड | ०२१४४-२७४०७८ |
| मीरामार सी रिसोर्टस, दमन- | ०२६०-२२५०६७१ |
| गुरुकृपा सी रिसोर्टस | ०२६०-२२५०६७१ |
| जझिरा सी रिसोर्टस | ०२६०-२२५४३३० |
| डॉम्निका बीच रिसोर्टस, मनोरी | ०२२-२८६७६५९१ |




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्ये १९ वे वार्षिक स्नेहसंमेलन



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर दीपप्रज्वलन करीत असतांना




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाध्यक्ष श्री वसंत अभ्यंकर डहाणू, कुलदैवतांना पुष्पहार अर्पण करीत असतांना



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत सादर केल्या बद्दल चि. रंजन विद्यानंद हिचे रोख पुरस्कार देऊन कौतुक करीत असतांना



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत व तबला वादन सादर केल्या बद्दल चि.अथर्व अनिल ह्याचे रोख पुरस्कार देऊन कौतुक करीत असतांना




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत सादर केल्या बद्दल रोख पुरस्कार देऊन चि. नचिकेत यांचे कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी श्री विजय अभ्यंकरांचे कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत सादर केल्या बद्दल रोख पुरस्कार देऊन सौ प्रज्ञा संजय हिचे कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत सादर केल्या बद्दल रोख पुरस्कार देऊन सौ अंजली संजय अभ्यंकर, आगाशी, विरार हिचे कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी उत्तम गीत सादर केल्या बद्दल कु. स्वरांगी संजय हिचे कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी श्रीमती सुलभा अभ्यंकर यांनी लोकल ट्रेन मध्ये अनुभवलेल्या विविध छटा, नक्कल रुपाने हुबेहुब सादर केल्या याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करीत असतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी कु. मानसी निशिकांत अभ्यंकर,ठाणे हिने एम.एस्सी परिक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण केल्या बद्दल संम्मेलनाध्यक्ष श्री वसंत अभ्यंकर, डहाणू यांच्या शुभ हस्ते रोख पुरस्कार देऊन सत्कार करीत असताना



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी अभ्यंकर परिवाराच्या ई-अभ्यंग मासिकात उत्तम लेख लिहिल्या बद्दल संम्मेलनाध्यक्ष श्री वसंत अभ्यंकर, डहाणू यांच्या शुभ हस्ते श्री मंगेश संजय कार्लेकर याला तृतीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्याच्या वतीने पुरस्कार स्वीकारतांना सौ.आरती संजय कार्लेकर.



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९ व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी कार्यक्रमाचा आस्वाद घेत असतांना महिला वर्ग



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी ८० वर्षाच्या श्रीमती सुलभा अभ्यंकर यांनी डहाणू येथील अभ्यंकरांनी केलेल्या सामाजिक व आर्थिक कार्याबद्दल माहिती दिली



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्री अनिल अभ्यंकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल सौ वैशाली अनिल यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना  परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्री प्रकाश अभ्यंकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्रीमती माधुरी विश्वास यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर




डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल डहाणू परिवाराचे तरुण सदस्य श्री विजय कार्लेकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल डहाणू परिवाराचे तरुण सदस्य रोहण, सौरभ आणि प्रियंका यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्री धनंजय अभ्यंकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्री विश्वास अभ्यंकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर



डहाणू येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित अभ्यंकर परिवाराच्या १९व्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी संम्मेलनाचे उत्तम व्यवस्थापन केल्या बद्दल श्री विद्यानंद अभ्यंकर यांचे पुष्प गुच्छ देऊन कौतुक करतांना परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा अभ्यंकर